

# ष्टींचा खजिना

ंत य. देशपांडे

ग्रं. सं. ठाणे

IRBK-0116450

किशोर कथा :: १२ ::

७८४९ वाचनालय बा.वा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# गोष्टींचा खजिना

लेखक

पंडित य. देशपांडे

किमत.

IRBK-0116450

IRBK-0116450

मंगल प्रकाशन : नागपूर १०

प्रकाशिका :

सौ. वीणा तिजारे,
मंगल प्रकाशन,
८५, माधवनगर,
नागपूर १०

सर्वाधिकार :
मंगल प्रकाशन

प्रथमावृत्ति :
२६ जानेवारी १९७५

मुद्रक :
श्रीकांत रा. बेडेकर,
मोहन प्रिंटर्स,
धनतोली;
नागपूर १२

ज्याच्या

आशिर्वादाने

मी

माझ्या साहित्याची

बाराखडी

गिरवली, त्या

**डॉ. अ. वा. वर्टी**

यासी

कृतज्ञतापूर्वक

अर्पण

पंडित य. देशपांडे

## कथानुक्रम

१ आयुष्यमान भव
२ लोहा लागे परीस
३ दान
४ मित्र-भक्तीचे फळ
५ चणे खावे लोखंडाचे
६ देव भक्तीचा भुकेला
७ एक होता भक्त
८ सुवर्णाची समई
९ पाषाणातला माणूस

१६४५० आ वा

# आयुष्यमान भव

खूप खूप वर्षापूर्वीची गोष्ट. वैष्णव नावाचे एक नगर होते. त्या नगराचा एक राजा होता. त्या राजाचे नाव होते, विष्णुराज.

विष्णुराज मोठा परोपकारी आणि दयाळू वृत्तीचा होता. त्याच्या नगरात कोणी उपाशी नव्हते, तापाशी नव्हते. प्रत्येक-जण गुण्यागोविंदाने राहत होता. राजा आपल्या प्रजेचा पुत्रवत संभाळ करीत असे. त्यामुळे प्रजेच्या मनात राजाविषयी नितांत आदर होता. श्रद्धा होती. दर वर्षी राजा आपला वाढदिवस मोठ्या आनंदाने साजरा करी. त्या दिवशी सारे वैष्णवनगर शृंगारले जाई. गरिबांना धनधान्य मिळे, विद्वानांचा बहुमान होई.

विष्णुराजाचे मांडलीक राजे आणि नगरातील प्रजाजन तसेच दरबारातील प्रधानमंत्री, संरक्षण मंत्री, आदी सर्व राज्य-प्रमुख विष्णुराजाला वाढदिवसानिमित्त नजराणा भेट देत.

परंतु ह्या भेटीमागे सर्वांचा हेतू स्वार्थी असाच दिसून येत असे. सैनिकाला सेनाप्रमुख होण्याची इच्छा, सेनाप्रमुखाला सेना-पती होण्याची इच्छा, वैद्याला राजवैद्य होण्याची इच्छा तर उपमंत्र्याला महामंत्री होण्याची इच्छा.

तरीही राजा विष्णुराज आपल्या वाढदिवसानिमित्त कोणाचे मन दुखवित नसे. सर्वांनी आनंदित असावे असा दूरवर विचार करून गेल्या वर्षी केलेल्या कामाचा आढावा घेऊन जे

# कथानुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | आयुष्यमान भव | १ |
| २ | लोहा लागे परीस | ७ |
| ३ | दान | १७ |
| ४ | मित्र-भक्तीचे फळ | २१ |
| ५ | चणे खावे लोखंडाचे | ३२ |
| ६ | देव भक्तीचा भुकेला | ४३ |
| ७ | एक होता भक्त | ५० |
| ८ | सुवर्णाची समई | [illegible] |
| ९ | पाषाणातला माणूस | ६७ |

९६,८५-
आ पा

# आयुष्यमान भव

खूप खूप वर्षापूर्वींची गोष्ट. वैष्णव नावाचे एक नगर होते. त्या नगराचा एक राजा होता. त्या राजाचे नाव होते, विष्णुराज.

विष्णुराज मोठा परोपकारी आणि दयाळू वृत्तीचा होता. त्याच्या नगरात कोणी उपाशी नव्हते, तापाशी नव्हते. प्रत्येक-जण गुण्यागोविंदाने राहत होता. राजा आपल्या प्रजेचा पुत्रवत संभाळ करीत असे. त्यामुळे प्रजेच्या मनात राजाविषयी नितांत आदर होता. श्रद्धा होती. दर वर्षी राजा आपला वाढदिवस मोठ्या आनंदाने साजरा करी. त्या दिवशी सारे वैष्णवनगर शृंगारले जाई. गरिबांना धनधान्य मिळे, विद्वानांचा बहुमान होई.

विष्णुराजाचे मांडलीक राजे आणि नगरातील प्रजाजन तसेच दरबारातील प्रधानमंत्री, संरक्षण मंत्री, आदी सर्व राज्य-प्रमुख विष्णुराजाला वाढदिवसानिमित्त नजराणा भेट देत.

परंतु ह्या भेटीमागे सर्वांचा हेतू स्वार्थी असाच दिसून येत असे. सैनिकाला सेनाप्रमुख होण्याची इच्छा, सेनाप्रमुखाला सेना-पती होण्याची इच्छा, वैद्याला राजवैद्य होण्याची इच्छा तर उपमंत्र्याला महामंत्री होण्याची इच्छा.

तरीही राजा विष्णुराज आपल्या वाढदिवसानिमित्त कोणाचे मन दुखवित नसे. सर्वांनी आनंदित असावे असा दूरवर विचार करून गेल्या वर्षी केलेल्या कामाचा आढावा घेऊन जे

उपमंत्री असतील त्यांना मंत्री, कोणाला वर्षासने, कोणाला विद्या-भूषणे, अशा नानाविध पदव्या देऊन त्यांचा सत्कार करीत असे.

परंतु या सर्व गोष्टी करताना राजा मात्र मनातून कष्टीच असे.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही राजाच्या वाढदिवसाचा दिवस उगवला. नगर संपूर्णपणे शृंगारले गेले. सुवासिनींच्या हाताने नगरातील राजपथावर रंगीबेरंगी रांगोळ्या काढण्यात आल्या. नगरातील देवादिकांना सुगंधित फुलांच्या माळा घालण्यात आल्या.

मंदिरांत नामवंत कीर्तनकारांची किर्तने सुरू झाली. प्रवचने सुरू झाली. जिकडे तिकडे आनंदी आनंद झाला होता.

परंतु नगराबाहेरच्या एका पर्णकुटीत एक विद्वान परंतु दरिद्री ब्राह्मण राहत होता. त्याचे नाव होते दयानंद महाराज. दयानंद आपल्या दमयंतीसह राहत होता. विद्वान असूनही दया-नंदजवळ द्रव्य नव्हते.

पर्णकुटीजवळ असणाऱ्या शेतात भाताचे पीक काढून आलेल्या उत्पन्नावर तो जगत होता. आणि विद्येचे दान मुक्त-हस्ते करीत होता.

विद्यार्थ्यांजवळून तो विद्यादानाचे धन घेत नव्हता. म्हणूनच ते स्वखुषीचे दरिद्रय त्यानें स्वीकारले होते. तो फक्त द्रव्याच्या बाबतीतच दरिद्री होता. परंतु मनाने उदार होता. श्रीमंत होता. आपले लाख मोलाचे ज्ञान तो विकीत नव्हता.

विद्या विकून द्रव्य मिळवावे हा विचार त्याच्या मनाला चुकूनसुद्धा शिवला नव्हता. परंतु आज मात्र दयानंद अतिशय दु:खी होता. कष्टी दिसत होता.

आज राजाचा वाढदिवस. लाखाच्या पोशिंद्याचा वाढदिवस होता तो. दरबारात राजाला प्रत्येक जण काहीना काही भेट देणार होता आणि राजाची कृपा संपादन करणार होता.

दयानंदाला राजाच्या कृपेची जरुरी नव्हती. परंतु भर दरबारात आपण रिक्त हस्ताने जावे हे त्याच्या मानी स्वभावाला पटेना म्हणून तो पर्णकुटीच्या एका उंचवट्यावर सचिंत मुद्रेने बसला होता आणि एकसारखा विचार करीत होता.

सचिंत मुद्रेने बसलेल्या आपल्या नवऱ्याकडे पाहून दमयंतीलाही काळजी पडली. अनेक आपत्तींना तोंड देऊन तो सत्त्वशील त्यागमयी, दयानंदबरोबर आनंदाने जीवन जगत होती आणि संसाराला उद्यानाचे स्वरूप देण्याचा प्रयत्न करीत होती.

परंतु आजची वेळ वेगळी होती. राजप्रमुखाचा वाढदिवस. वाढदिवसाला रिक्त हस्ताने जाणे बरे नव्हे, हे तिलाही समजत होते. परंतु ऋण काढून पोशिंद्याची पूजा बांधणे ही गोष्ट त्या त्यागमयीला सहन होण्यासारखी नव्हती.

यातून कांही तरी मार्ग काढणे जरूर होते. आवश्यक होते.

तिने चुलीवर ठेवलेला भात उतरून ठेवला. आणि आपल्या पतीच्या सान्निध्यात येऊन पतीला अभिवादन करून ती साध्वी शांतपणे म्हणाली.

"नाथ ! यावर एक उपाय मला सापडला आहे. कथन करण्यास अनुज्ञा आहे का ?"

पत्नीचे हे उद्गार ऐकताच. . . . .दयानंद हर्षभरित होत म्हणाले, "कथन करा, त्यात पूर्व परवानगी कशाला."

"हे पाहा ! आज महाराजांचा वाढदिवस. आज सर्व दरबार फुलांप्रमाणे सुशोभित होणार ! अनेक धनिक, अमीर, उमराव, मंत्री, महामंत्री मोठमोठे नजराणे आणि भेटी घेऊन महाराजांना सामोरे जाणार ! ही गोष्ट सत्य आहे परंतु ह्या भेटीमागं प्रत्येक जणाच्या आशा गुंतलेल्या आहेत. ह्या भेटीमागं स्वार्थाचा भुजंग फणा वर काढून बसलेला आहे,

आपणांला मात्र त्यांच्याजवळ काही मागायचं नाही. परमेश्वरानं आपल्याला भरपूर दिलंय. न्यायनिपुण राजकुमार तुम्ही आपल्या विद्येनं तेजस्वी केलेले आहेत. त्यांच्या कर्तृत्वाचा सुगंध आजही दरवळतो आहे. तुमचं कर्तृत्व महान आहे ही गोष्ट निर्विवाद आहे.

तेव्हा तुम्ही फक्त राजाला आशीर्वाद द्या ? ह्या लाख मोलाच्या आशिर्वादासाठी राजा भुकेला आहे ज्यांना मान, पदव्या हव्यात त्यांनी खुशाल राजाला भेटी द्याव्यात, नजराणे द्यावेत. आपण फक्त राजाला आशीर्वादच द्यावा. लाख मोलाचा आशीर्वाद. म्हणजे–'आयुष्यमान भव'

धर्मपत्नीचे हे तेजस्वी उद्‌गार ऐकताच दयानंदाचा मलीन चेहरा एकदम तेजस्वी झाला आणि डोळ्यांत आनंदाश्रू गोळा झाले.

डोळ्यांत गोळा झालेल्या आनंदाश्रूंना मुक्त हस्ते वाट करून देत ते तसेच आपल्या आसनावरून उठले अंगावर उपरणे टाकून!

आपल्या धर्मपत्नीसह ते राजदरबाराचा मार्ग आक्रमण करू लागले. राजवाडा गर्दीने फुलून गेला होता.

संगमरवरी राजवाड्याच्या पांढऱ्या शुभ्र पाषाणावर मध्यान्हीचा सूर्य तळपत होता. राजदरबाराच्या प्रवेशद्वारावरील

महिरपी आम्रवृक्षांच्या डहाळयांनी सुशोभित झालेल्या होत्या. प्रवेशद्वारावर असणारे रक्षक हाती सोन्याचे दंड घेऊन उभे होते.

आणि बाहेर प्रत्येकजण हिरेमाणकांनी भरलेली ताटे घेऊन याचक म्हणून उभा होता.

दयानंद हे सर्व पाहत होते. हिरेमाणकांनी भरलेल्या सुवर्णाच्या थाळ्या असूनही मानव पुन्हा राजकृपेची अभिलाषा मनात बाळगूनच होता.

दयानंद सपत्नीक आलेले पाहताच सर्व लोक आदराने बाजूला झाले. विद्वान म्हणून त्यांना नगरात मान होताच.

दरबारात दयानंद सपत्नीक आलेले पाहताच राजा सिंहासनावरून उठला. दयानंदांचे स्वागत करून त्यांना अगत्यपूर्वक बसावयास आसन दिले.

आणि मग पुन्हा भेटी स्वीकारण्याचा कार्यक्रम सुरू झाला.

गोरज मुहूर्त होईपावेतो हा कार्यक्रम चालूच होता. अगदी अव्याहतपणे. सर्वांच्या भेटी देऊन संपल्या. मग दयानंद उभे राहिले आणि शांतपणे म्हणाले.



" महाराजांचा विजय असो, त्यांचा कीर्ति सुगंध असाच दरवळत राहो. महाराजांना देण्यासारखं जे आता देत आहेत ते मजजवळ नाही.

सुवर्णफुलांनी पूजा बांधण्याचं सामर्थ्य ह्या ब्राह्मणात नाही ही गोष्ट

खरी आहे. आम्ही उपासना केली ती सरस्वतीची त्यामुळं लक्ष्मी आम्हांला प्रसन्न नाही. परंतु त्याचा आम्हाला खेद अथवा खंत नाही. दरबारात महाराजांनी केलेलं स्वागत म्हणजे लक्ष्मीनं केलेलं सरस्वतीचं स्वागत असं मी मानतो. तो मान मला मिळाला.

तो आनंद मला त्रिभुवनांपेक्षा श्रेष्ठ आहे म्हणूनच मी महाराजांना सुवर्णफुलांची भेट देत नाही. रत्नं हिरे, माणकं, मी गरीब ब्राह्मण कोठून देणार ?

पण आतापर्यंत कुणीही भेट दिली नाही अशी अमोल भेट मी देणार आहे, ती म्हणजे आशीर्वाद ! ह्या ब्राह्मणाचा आशीर्वाद.

अन् तो म्हणजे, "आयुष्यमान भव" असे म्हणून दयानंदानी आपल्या पत्नीसह हात उंचावले. सारा दरबार चित्रासारखा तटस्थ झाला. सगळीकडे शांतता पसरली.

हा आयुष्याचा मंगलमय मंत्र ऐकताच राजा सिंहासनावरून उठला आणि त्याने दयानंदाचे कृतज्ञतेने पाय धरले. त्या पवित्र चरणांवर आनंदाश्रूंचा वर्षाव करीत विष्णुराज म्हणाले :

" मला हाच आशीर्वाद पाहिजे होता. पण मी सांगू शकत नव्हतो. एवढं वैभव असूनही ह्या वात्सल्याचा आशीर्वाद मला माझ्या वैभवापेक्षाही श्रेष्ठ आहे.

" तुमचा आशीर्वाद मला पित्यानं दिलेल्या आशीर्वादासमान आहे. तो मी आनंदानं माझ्या मस्तकी धारण करतो."

दरबारातील मानकरी हे अपूर्व दृष्य पाहून स्तिमित झाले.

□ □ □

# लोहा लागे परीस

सागरतीरावर, प्रभू रामचंद्र, बंधुसखा लक्ष्मण आदी वानरसेना येऊन दाखल झालेली होती.

सभोवार पसरलेला अथांग सागर प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शाने थयथय नाचत होता. सागराच्या लाटा प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शाने स्वत:ला पुनीत करून घेण्यासाठी म्हणून वारंवार सागरकिनाऱ्यावर येत होत्या आणि पावन होऊन भरल्या अन्तःकरणाने जात होत्या. अगदी आनंदाने.

सभोवार पसरलेला अथांग सागर पार करून, सीतेला लंकेतून परत आणावयाचे होते. रावणासारख्या बलाढ्य अशा सम्राटाशी तो सामना होता. परंतु मर्यादा-पुरुषोत्तम राम, रावणाचा पराभव करून सीतेला एका नव्या उत्साहात माघारी आणणार होता आणि अयोध्येला घेऊन जाणार होता.

हे एकच एक ध्येय उराशी बाळगून आपल्या वानरसेनेसह रावणासारख्या बलाढ्य अशा अतिमानवी राज्यसम्राटाशी लढावयास, मर्यादा पुरुषोत्तम प्रभू राम आपले अक्षय बाण-भाता स्कंधाला लावून हाती धनुष्य घेऊन सिद्ध झालेले होते.

आपली मूठभर अशी वानरसेना घेऊन प्रभू रामचंद्र रावणाला सशस्त्र सामोरे जाणार होते. आणि बलाढ्य राज्यसम्राटाविरुद्ध युद्धाचे रणशिंग वाजविणार होते. लंकाधीशाला नेस्तनाबूद करणार होते.

अर्थात यासाठी अथांग पसरलेला सागरराज पार करणे अत्यावश्यक होते.

सागरराज प्रभू रामचंद्रांकडे विनम्रपणे पाहत होता आणि रामाच्या आज्ञेसाठी आतुर झालेला होता.

लंकाधीशाच्या सोन्याच्या लंकेत जाण्याचा एकच एक मार्ग होता आणि तो म्हणजे सागर उल्लंघन करण्याचा. सागर पार करणे हे एक अतिशय मोठे अशा प्रकारचे दिव्य होते.

परंतु प्रभू रामचंद्र स्वस्थपणे सागरतीरावर असणाऱ्या एका भल्या थोरल्या अशा शिळेवर स्थानापन्न झालेले होते. प्रभू रामचंद्र विचार करीत होते. परंतु विचारांच्या उदासीनतेची अस्पष्टशीसुद्धा रेखा त्यांच्या प्रसन्न अशा मुखकमलावर उमटलेली दिसत नव्हती. मुखकमलावर झळकत होते ते फक्त मंदसे स्मित.

बाजूस उभा असलेला बंधुसखा लक्ष्मण हृदयावर हातांची घडी करून त्या विशाल अशा सागराकडे पाहत होता आणि हा अथांग सागर मागे हटविण्यासाठी कोणते अस्त्र उपयोगात आणावे याचाच विचार बंधुसखा लक्ष्मणाच्या मस्तकात भ्रमण करीत होता.

आदित्यनारायण मध्यान्हीला आला तेव्हा वीर हनुमानाची उत्सुकता त्याला आता अगदीच सहन होईनाशी झाली. बाहू स्फुरण पावू लागले होते. नेत्रांमध्ये एक आगळेच अशा प्रकारचे तेज निर्माण झाले होते.

उत्सुकता अजिबातच स्वस्थ बसू देईनाशी झाली, तेव्हा वीर हनुमान मनाशीच पुन्हा एकवार रामनाम स्मरण करून

प्रभू रामचंद्राला सामोरे गेले आणि सप्रेम अभिवादन करीत म्हणाले.

"प्रभू ! एक विनंती करण्याची इच्छा आहे. त्याला कारणही तसंच आहे. उत्सुकता आता ह्या हृदयात मावेनाशी झालेली आहे. अभय दिलंत तर इच्छा कथन करतो. लहान तोंडी मोठा घास घेण्याचा हा माझा पहिलाच प्रयत्न आहे. कथन करताना जीभ अडखळते आहे. हृदय धडधडते आहे. पण काय करू. हृदयातली उत्सुकता स्वस्थ वसू देत नाही, प्रभू ! क्षमा करा प्रभू !

हनुमानाचे हे नम्रतापूर्ण उद्गार ऐकताच ....प्रभू राम प्रसन्न चेहरा करीत वीर हनुमानाच्या पाठीवरून आपला स्नेहपूर्ण हात फिरवीत म्हणाले,

"बोल ! हनुमान बोल ? अरे, तू स्वत:ला इतका का कमी लेखून घेतोस ? मला जसा लक्ष्मण, तसाच तूही अगदी पाठच्या भावासारखा. मनात यत्किंचितही किंतू न बाळगता तुझं हृदय मजजवळ मोकळ कर ! कोणतीही संकटं अथवा आपत्ती एकमेकांच्या साहाय्याशिवाय दूर करताच येत नाहीत. मग ते सहकारी मुंगीएवढे का असेनात. पण, एखादा लहानसा जीवही अमोल अशा प्रकारचं सहकार्य करून जातो आणि मग आश्चर्यचकित होण्याची पाळी येते साहाय्य ज्यानं मागितलं त्याच्यावर.

मनात यत्किंचितही किंतू न बाळगता तू तुझं हृदय मोकळ कर."

प्रभू रामाचे हे बोलणे ऐकताच वीर हनुमानाचे हृदय क्षणभर का होईना पण आनंदाने मोहरून निघाले. डोळ्यात

आनंदाश्रूंनी गर्दी केली आणि त्या आनंदाश्रूंना मुक्तपणे वाट देतच हनुमान विनम्रपणें हात जोडीत म्हणाला,

"प्रभो ! मला असं वाटतं. आपणच आपल्या परम पवित्र अशा स्वहस्तानं सागर किनाऱ्यावर असणारी शिळा सागरात सोडावी. आपल्या पवित्र हस्तानं पुनीत झालेली ती शिळा निश्चितच सागरजलावर अधांतरी राहील.

शिळा आपणांला नवीन नाही. शापाने माता अहल्याही शिळाच झाल्या होत्या. त्यांचा उद्धारही आपल्या पदस्पर्शानेच झालेला आहे.

आपण सागरात सोडलेली शिळा तरली की, इतरही शिळा आपल्याच नावानं सागरात सोडू. अशा अनेक शिळा तरतील



आणि हा भव्य अशा प्रकारचा रामसेतूच निर्माण होईल आणि या रामसेतूवरूनच आपण लंकाधीशाच्या लंकानगराचा मार्ग

सुलभतेने आक्रमण करू शकू."

वीर हनुमानाचे हे भाषण ऐकताच. . . . प्रभू रामचंद्रांच्या मुखकमलावर स्मिताची मंद रेखा क्षणकाल विजेसारखी चमकून गेली.

प्रभू रामचंद्र शांतपणे म्हणाले,

"अरे हनुमन्ता ! अरे हे प्रथमच नाही का सांगायचं ! तुला एवढी खात्रीच आहे, तर मग विलंब तरी कशासाठी, एकच शिळा काय ? असंख्य शिळा मी सागरात मोठ्या आनंदानं सोडीन. आण बघू शिळा."

प्रभू रामचंद्रांचे हे बोलणे ऐकताच . . . . उत्साहित अन्तःकरणाने हनुमानाने पुन्हा एकवार नम्रपणे हात जोडले आणि आदरपूर्वक बाजूला गेला आणि एक प्रचंड शिळा तळहातावर घेऊन ती शिळा प्रभू रामचंद्रांच्या पवित्र अशा पदकमलाजवळ आणून ठेवली.

एकवार त्या शिळेकडे सहास्य मुद्रेने पाहून व एकदा सागराकडे पाहून ती प्रचंड शिळा आपल्या बाहूंनी वर उचलताच . . . .

"प्रभू रामचंद्रजी की जय" ही एकच एक घोषणा निनादली आणि सारा आसमंत ह्या पवित्र घोषणेने दुमदुमुन निघाला. एक प्रकारच्या आत्मिक आनंदाने सर्वांचीच अन्तःकरणे वहरून निघाली.

डोळ्यांत आनंद साठवून वानरसेना, स्वतः हनुमान आणि बंधुसखा लक्ष्मण त्या शिळेकडे व प्रभू रामचंद्रांकडे पाहत होते.

प्रभू रामचंद्र मात्र मनाशी हसतच होते. आपल्या बलशाली बाहूंनी त्यांनी ती प्रचंड शिळा मस्तकावर घेतली आणि हळु-वारपणे सागरात सोडली आणि तत्कालीच ....

सागरजलाची भली मोठी कारंजी उंचच उंच वर उडाली आणि त्याच प्रमाणात ती प्रचंड शिळा हळू हळू सागरात खोल खोल जाऊ लागली.

थोडा कालावधी गेला आणि पुन्हा पूर्ववत सागराच्या रेशमासारख्या लाटा किनाऱ्याकडे धाव घेऊ लागल्या.

सगळेच आश्चर्यचकित झाले होते. बंधुसखा लक्ष्मणही भांबावून गेला.

प्रभू रामचंद्र मात्र मनाशी हसतच होते. शिळा तरली नाही हेच बरे झाले. हेच एक मोठे समाधान त्यांना वाटत होते. आणि त्या समाधानाचा आनंद त्यांच्या शांत आणि तेजस्वी अशा मुखकमलावर क्षणोक्षणी प्रकट झालेला दिसून येत होता.

हनुमानही अवाक् झाला होता. घटना घडली होती परंतु वीर हनुमानाच्या हृदयात मात्र कालवाकालव होत होती. न भूतो न भाविष्यती अशा प्रकारची ही घटना होती. पण असे, झालेच कसे ? याचे कारणही कुठे सापडत नव्हते.

अजिबातच राहवेना तेव्हा पुन्हा एकवार हनुमान नम्रतेने म्हणला,

"प्रभू ! आपण सागरात सोडलेली शिळा सागरजलावर का बरं अधांतरी राहिली नाही."

हनुमानाचे हे बोलणे एकताच प्रभु राम स्मितहास्य करीत म्हणाले,

"अरे, वेडाच आहेस बघ तू, अरे किती केलं तरी ती शिळाच. वजन जास्त होतं ना तिचं. मग ती सागराच्या पोटाशीं जाणार नाहीं तर काय बाहूवर राहून तरंगणार होय रे !"

"प्रभू ! अर्थ समजला पण त्यामागचा भाव मात्र समजला नाही, तरी पण एक इच्छा आहे. अनुज्ञा मात्र आपण दिली पाहिजे." हनुमान नम्रतेने म्हणाला.

आता ती शिळा सागरात सोडतो पण त्यापूर्वी आपलं, "शुभ, नाम" ह्या शिळेवर अंकित करूनच मी ती शिळा सागरार्पण करतो. शिळा अर्पण करताना मात्र मी सागरराजाला नम्रपणे कथन करणार की :

"प्रभू रामचंद्रांच्या शुभ नामानं ही शिळा आता पुनीत झालेली आहे. अशी ही पवित्र शिळा आपल्या हृदयाशी न कवटाळता त्या शिळेला आपल्या बलशाली अशा बाहूंचा आधार द्या. ह्याच शिळेवरून माझ्या प्रभू रामचंद्रांचे पहिले पवित्र चरण पडून, माझा राम लंकेला जाणार आहे. असत्याशी सत्य झुंज देणार आहे. ह्या सत्कार्यासाठी आपलाही हातभर लागू द्या."

असे म्हणून "जय प्रभू रामचंद्रकी जय" असा जयघोष करीतच वीर हनुमानाने अत्यानंदाने एक प्रचंड शिळा चरणासमीप आणून त्या शिळेवर प्रभू रामचंद्रांच्या अनुज्ञेने "श्रीराम" ही तीन अक्षरे रेखांकित केली.

रेखांकित झालेल्या शिळेवर प्रभू रामचंद्रांनी प्रसन्न चित्ताने हस्तस्पर्श केला आणि पुन्हा एकवार हनुमानाला आशीर्वाद दिला.

प्रभू रामचंद्रांच्या हस्तस्पर्शाने पावन झालेली ती शिळा हनुमानाने "प्रभु रामचंद्रजी की जय" असे म्हणताच ती शिळा

मस्तकावर घेतली आणि आदरपुर्वक सागराला समर्पण करून सागरराजाला भक्तिभावाने हात जोडले.

सर्व वानरसेना, लक्ष्मण आणि हनुमान त्या शिळेकडे अवाक् होऊन पाहत होते. प्रभू राम मात्र स्मित हास्य करीत होते.

सागरजलात सोडलेली शिळा हळहळू खाली जाऊ लागली.

आणि एकदोन क्षण गेले असतील नसतील तोच ती प्रचंड शिळा कमलपुष्पाप्रमाणे त्या अथांग पसरलेल्या जलाशयात तरंगत राहिली.

कमलपुष्पाप्रमाणे तरंगत असलेल्या त्या शिळेकडे पाहताना हनुमानाचा ऊर भक्तिभावाने उचंबळून आला. कृतज्ञतेने त्याने सागराला पुन्हा एकवार वंदन केले. प्रभू रामचंद्रांच्या पद-कमलांवर आनंदाश्रूंचा अभिषेक केला तेव्हां, आसमंत दरवळून सोडणारी घोषणा निनादली.

"प्रभु रामचंद्रकी जय"

रामप्रभूला विनम्रपणे सप्रेम अभिवादन करीत हनुमान शांतपणे म्हणला,

"हे प्रभो ! आपण स्वहस्ते सागरात सोडलेली शिळा सागरराजाने आपल्या हृदयाशी कवटाळून घेतली, परंतु आपले शुभ नाम मस्तकी धारण केलेल्या शिळेला मात्र सागराने आपल्या सहस्त्रावधी बाहूंचा आधार देऊन शिळा जलावर तरंगत ठेवली. कमलपुष्पासारखी शिळा सागरलाटांवर नाचू लागली, एखाद्या अजाण आणि निष्पाप बालकासारखी. हा चमत्कार कसा घडला ?"

"अरे हनुमन्ता ! हा सर्व तुझा माझ्यावरील भक्तीचा प्रभाव दुसरं काय !" प्रभू रामचंद्रांनी हंसतच उत्तर दिले.

"भक्तसखा हनुमान ! ज्या गोष्टी मी अगदी प्रथमपासून टाळीत होतो तीच गोष्ट तू हट्टानं मजजवळून पुरी करून घेत आहेस ? मिथ्या कथण करणं हे मी प्रथमपासूनच महापाप म्हणून समजत आलोय ? म्हणूनच तुला सत्य काय ते सांगतों.

मी एखादं अस्त्र सोडूनही सहस्रावधी बाणांचा सेतू ह्या सागरावर अधांतरी तयार झाला असता. पण तोही मी टाळला. माझ्या ह्या रामायणात तुझ्या कर्तृत्वाचा, तुझ्या भक्तीचा, तुझ्या मजवरील असणाऱ्या प्रेमाचा, तुझ्या अंगी असणाऱ्या अलौकिक गुणांचं दर्शन सतत आणि पदोपदी घडावं, तू चिरंजीव व्हावंस आणि माझ्या नामाबरोबरच तुझी भक्तीही चंद्र-सूर्य असेपर्यंत दरवळत राह्यावी अशी माझी मनोमन इच्छा आहे आणि याकरिताच मी बाण तसाच भात्यात ठेवला. त्याला चुकून हस्तस्पर्शही केलेला नाही. आणि केवळ तुझ्या प्रेमळ अशा आग्रहास्तव मी शिळा सागरसमर्पण केली. पण शिळा सागरात सोडताना मी सागराला विनंती केली की, ही शिळा तू आपल्या विशाल अशा हृदयात सामावून घे ! तिला वर सोडू नकोस. म्हणूनच ती शिळा वरवर न येता सागराशी एकरूप झाली."

"क्षमा करा प्रभू ! मी सोडलेली शिळा सागराच्या जलाशयावर कशी अधांतरी तरंगत राहिली ?"

हनुमानाने नम्रतेने हात जोडीत मध्येच म्हटले.

"तू सागरात शिळा सोडलीस तेव्हा मी पुन्हा विनंती केली की, हनुमानाने सोडलेल्या शिळेला तू तुझ्या विशाल अशा

सहस्त्रावधी बाहूंचा आधार दे आणि शिळा सागर लाटांवर अधांतरी तरंगत असताना दिसू देत.

ज्या वेळी एखादा भक्त परमेश्वराचा लाडका असतो त्या वेळी स्वत: परमेश्वर आपल्या भक्ताला महत्त्व प्राप्त करून देण्यासाठी स्वत: मागं होतात आणि भक्ताला पुढं करून महत्कार्य भक्ताकडूनच करवून घेतात. त्याचा मान वाढवितात. भक्ताला मोठेपणा प्राप्त करून देतात.

लोह आपल्यासमीप आलं की, ज्याप्रमाणे परीस त्याची कान्ती सुवर्णाची करून टाकतो आणि त्याची किंमत वाढवितो. त्याचा मान वाढवितो. तसच परमेश्वरासमीप आलेल्या भक्ताचं असतं. भक्ताची भक्ती मात्र निष्काम असली म्हणजे झालंमग स्वत: परमेश्वरही आपल्या सामर्थ्याचा, आपल्या तेजाचा देदीप्य-मान प्रकाश भक्ताच्या सर्वांगावर टाकून भक्ताला तेज:पुंज करतो ज्या ज्या वेळी रामसेतूचं नाव निघेल त्या त्या वेळी तुझी भक्तीच प्रथम नजरेस येईल आणि मगच मानव माझं नाव घेतील."

प्रभू रामचंद्रांचे हे भाषण ऐकताच हनुमानाच्या डोळ्यांतून आनंदाश्रूंच्या धारा वाहू लागल्या. त्याचा ऊर अत्यानंदाने भरून आला.

पुन्हा एकवार "प्रभू रामचंद्र की जय" असे म्हणून हनुमान भराभर प्रचंड अशा एकेका शिळेवर "श्रीराम" "श्रीराम" हे शुभ नाम रेखांकित करून प्रभू रामचंद्रांच्या शुभ नामाने पुनीत झालेली एकेक शिळा सागरात समर्पण करू लागला.

□ □ □

# दान

सुर्योदयाची वेळ होती. भगवान बुद्धदेव आपल्या शिष्य-गणांसह मार्ग आक्रमण करीत होते.

सगळे पशुपक्षी आनंदातिशयानं आपल्या भक्ष्याच्या शोधासाठीं आपल्या घरट्यांतून आणि गुहेतून बाहेर पडले होते.

भगवान बुद्धही आपल्या शिष्यांसमवेत—

"बुद्धं शरणम् गच्छामि"

या महामंत्राचा जप करीत करीत चालले होते.

मार्ग आक्रमण करीत असतांना एका खेडेगांवात ते आले.

त्या खेड्यांतील मानवाची दयनीय परिस्थिति पाहून भगवान बुद्धांच्या काळजांत चर्रर झाले.

उघडीनागडी लहान लहान पोरं ज्यांना निवारा नाही, खाण्यास अन्न नाही अशी नुकतीचं चिखलांतील कमळं पाहून त्यांच्या हृदयांत कालवाकालव झाली. बायाबापड्यांची तीच अवस्था पाहिल्यानंतर मात्र त्यांच हृदय अक्षरशः विदीर्ण झाले.

आणि तत्क्षणींच त्यांनी आपला मार्ग बदलला आणि ते मध्यान्हीच्या समयास एका नगरात प्रवेश करते झाले.

त्यांचे शिष्य गुरुआज्ञेनुसार दीनदुबळ्यांसाठी भिक्षा मागत चालले होते आणि म्हणत होते:

"हे बांधवानों, दीनदुबळ्यांना उपासमारीच्या तडाख्यांतून वांचविण्यासाठीं आम्हांला वस्त्रं द्या, धान्य द्या, भिक्षा द्या."

"सूर्यनारायण तुम्हांला प्रकाश देतो."
"पर्जन्यराज तुम्हांला पाणी देतो."
"वायुदेव तुम्हांला हवा देतो."
"वृक्षराज तुम्हांला फळ देतो, छाया देतो."



"हें सर्व देवच तुम्हांला कसल्याही प्रकारची अपेक्षा मनांत न धरतां देतो. केवळ तुम्ही त्याची पृथ्वीवरील लेकरं आहांत म्हणूनच ना.

"मग, तुमचेच जे बांधव आयाबहिणी डोंगरांच्या पलीकडे उपासमारीनें मरताहेत त्यांना तुम्ही काय देतां ?"

शिष्यांची ही हृदयभेदक वाणी ऐकतांच सगळें नगरवासी एक प्रकारच्या ग्लानीतून जागे झाले.

नगरवासीयांनीं भराभर आपली रेशमी भरजरी वस्त्रें, आभूषणें बुद्धदेवांच्या पायांजवळ आणून ठेवली.

राजानेंही आपल्या खजिन्याज्या किल्ल्या बुद्धदेवांच्या पायांजवळ ठेवल्या.

हां हां म्हणतां सुवर्णाचा, वस्त्र आभूषणांचा मानव निर्मित ढीगच तेथें जमा झाला.

बुद्धदेवांनीं तें सर्व पाहिलें, परंतु त्यांच्या मनाला आनंद झाला नाहीं. हें दान होतं. परंतु त्या दानावर अहंकाराचें झांकण

होतं आणि त्यामुळेंच त्या अहंकाराच्या पांघरुणाखालीं त्या दानाची किंमत मार्गावरील धूलीकरणाप्रमाणेंच होती.

क्षणभरच त्यांनी त्या ढिगाकडे पाहिले आणि आपल्या शिष्यगणांसह ते पुन्हां मार्ग आक्रमण करूं लागले.

एव्हांना राजाही आपल्या प्रजाजनांसह बुद्धदेवांच्या मागोमाग मार्ग आक्रमण करीत होता.

नगराची सीमा संपली. तरीही राजा बुद्धदेवांच्या मागोमागच होता.

नगरसीमेच्या एका टोंकाला एक महारोगी आपल्या झडलेल्या हातांनीं एका कुंभ पात्रांत मिळालेली भिक्षा खात होता.

त्या महारोग्यानें "मला भिक्षा द्या, आम्हांला भिक्षा द्या," अशी कानाला तृप्त करणारी वाणी ऐकली मात्र....

शरीराने जर्रर झालेली तो म्हातारा कुष्टरोगी तसाच धडपडत उठला. आणि त्याने तें कुंभपात्र आपल्या थोटचा हातानं उचलून ठेंचाळत ठेंचाळत बुद्धदेबांच्या पायांजवळ ठेवलं आणि हात जोडून म्हणाला.

"देवा, तुम्ही कोण हें मला माहीत नाहीं. परंतु भिक्षा द्या, हें ऐकलं आणि माझं हृदय खळबळून आलं.

"दीन दुबळा, अपंग आणि त्यांतून सर्वांगाला झालेल्या कुष्ठानें माझी अवस्था दयनीय आहे. मीच मुळांत दुसऱ्याच्या अन्नावर जगतों आहे. मजजवळ तुम्हांला देण्यासारखं कांहीं नाही. एवढीच भिक्षा आहे ती घ्या. आणि मला पावन करा. तेवढंच ह्या देहाचं जन्माचं सार्थक होईल."

त्या कुष्ठरोग्याचें हें बोलणें ऐकतांच बुद्धदेवांच्या डोळयांतून आनंदाचे अश्रू झर्झर् गालांवरून ओघळू लागले. आणि क्षणाचाही विचार न करितां त्यांनीं त्या महारोग्याला आपल्या हृदयाशीं कवटाळत म्हटलें.

"अरे, तूं खरा श्रीमंत आहेस. राजाच्या राजवैभवालाही लाजविणारी तुझी भिक्षा ही मला राजखजिन्यापेक्षांही श्रेष्ठ मोलाची आहे. अशा भिक्षेचं मोल प्रत्यक्ष देवालाही करतां येणार नाही. त्याच मोल मी एक पामर काय करणार ?

"अहंकाराच्या वस्त्राला दूर फेकून दयाळू अन्त:करणानें आणि प्रेमाने दिलेलं दान हेच सर्व दानांपेक्षां श्रेष्ठ दान आहे

"शुभ्र स्फटीकाच्या जलांत पडलेलं मातीचं यत्किंचितही ढेकूळ त्या पाण्याचा शुभ्रपणा नाहीसं करतं आणि ते पाणी गर्दभालासुद्धां पिण्यास उपयोगी पडत नाहीं.

"तसंच अहंकारानें दिलेल्या दानाचं आहे.

"म्हणूनच तूं दिलेली ही केवळ भिक्षा नाही, तर तें एक सर्वश्रेष्ठ दान आहे, म्हणूनच मी ही तुझी भिक्षाच स्वीकारीत नसून पृथ्वीच्या पाठीवरील एका सर्व श्रेष्ठ दानाचा असंख्य दीनदुबळयांच्या वतीनें साभार स्वीकार करतो आहे."

असं म्हणतांच राजाला आपली चूक कळून आली. त्यानं पश्चातापाच्या अश्रूंनीं बुद्धदेवांच्या पवित्र चरणांवर अभिषेक केला.

सर्व नगरवासी आणि राजा व कुष्ठरोगी यांना मंगल आशिर्वाद देऊन पांढऱ्या शुभ्र वस्त्राखालीं ते पवित्र दान झांकून भगवान बुद्ध पुन्हां खेडयांचा मार्ग आक्रमण करूं लागले.

□ □ □

# मित्र-भक्तिचे फळ

फार वर्षांपूर्वीची ही एक गोष्ट आहे. त्या काळात मंगलपूर नांवाच्या एका आटपाट नगरात देवगुप्त या नांवाचा एक अतिशय श्रीमंत व्यापारी राहत होता.

देवगुप्त उत्तम प्रकारचा व्यापारी असल्यामुळे आणि ह्या शिवाय तो उदार अंत:करणाचा व दयाळू स्वभावाचा असल्या-मुळे त्याच्याकडे नेहमीच या ना त्या निमित्ताने दूरदूरच्या प्रदेशात वास्तव्य करणारे त्याचे मित्रगणांचे तांडे येत असत.

एके दिवशी सायंकाळच्या प्रशांत समयी देवगुप्त आपल्या भव्य अशा दिवाणखान्यात सहजपणें बसला असता त्याच्या मनात एकाएकी विचार आला की, आज आपण इतके दिवस झाले आपल्या मित्रांना सर्वतोपरी सहाय्य करत आहोत पण या मित्रांपैकी एकजणाने देखील आपल्याला कधी बोलाविले नाही. गावी गेल्यानंतर साधा खुशालीचा निरोप देखील कोणी आपणाला पाठवित नाही. सगळेच मित्र तेवढ्यापुरते आपल्याला मान देऊन स्वत:ची गरज भागवून घेतात एकदा गरज भागली की पुन्हा जेव्हा गरज पडेल तेव्हा आपणाकडे धाव घेतात. तेव्हां हे असे कां ? आपला मित्रगण वरवर मात्र आपली स्तुति करतात कारण आज आपल्याजवळ अगणित अशी संपत्ति आहे. नोकर-चाकरांनी सारा वाडा गजबजून सोडलेला आहे. ईश्वराच्या

कृपेने आपणाला ४–५ मुले आहेत. आणि ह्या एकंदर वैभवामुळेंच आपणाला आपले मित्र मान तर देत नसतील ना? आणि जर आपण लक्षाधीशाचे भिक्षाधीश झालों तर, हेच मित्र आपली साधी विचारपूस तरी कशावरून करतील ? बस् ! हा एकच विचार देवगुप्ताच्या मनांत घर करून बसला. तो रात्रंदिवस मनाशी विचार करू लागला की, या सर्व मित्रां-मध्ये आपल्यावर प्रेम करणारे मित्र कोण आहेत आणि आपल्या संपत्तीवर प्रेम करणारे मित्र कोण आहेत ? याचा अंदाज आप-णाला कळला तर आपल्याला खरा मित्र जवळ करतां येईल आणि केवळ संपत्तीवर प्रेम करणाऱ्या भोंदू मित्रांना आपल्याला दूर करता येईल.

असा विचार मनात येताच देवगुप्ताला एक प्रकारचे आत्मिक समाधान वाटले. आणि तो खऱ्या मित्रांची, आपल्या जीवाला जीव देणाऱ्या मित्रांची संपत्तीला तुच्छ समजणाऱ्या मित्राची परीक्षा घेणाच्या योग्य समयाची वाट बघू लागला.

विजयादशमीचा सण नुकताच पार पडल्यामुळे देवगुप्ता-कडे आता बाहेरगावचे कोणीच पाहुणचाराला नव्हते.

प्रत्येक मित्र आता आपल्या सुखस्वप्नात दंग असल्यामुळे आपल्या मित्रांची परीक्षा घेण्यास हीच वेळ योग्य आहे असा विचार करून देवगुप्ताने आपल्या मुख्य मुनिमजीला बोलावून घेतले. आणि योग्य ती हकीगत त्याच्या कानावर घातली. पुढे लवकरच एकदोन दिवसात योग्य ती रक्कम बरोबर घेऊन देवगुप्ताने भल्या पहाटेच मंगलपूर सोडले.

मंगलपूरची सरहद्द ओलांडल्यानंतर त्याने आपले कपडे गाठोड्यात बांधून ते गाठोडे आपल्या पडशीत टाकले आणि पडशीत असणारे फाटके तुटके कपडे अंगावर घालून तो मोठ्या उत्साहाने आपला मार्ग आक्रमण करू लागला.

आपल्या सगळ्या मित्रांचे पत्ते त्याच्या तोंडपाठ असल्या-मुळे आपल्या मित्रांचा शोध आपण सहजगत्या करू अशा प्रकारचा आत्मविश्वास त्याच्या समाधानी चेहऱ्यावर दिसून येत होता. मोठ्या आनंदाने देवगुप्त आपला मार्ग आक्रमण करीत होता.

मजल दरमजल करीत करीत देवगुप्त एका भल्या पहाटेच चंद्रनगर नांवाच्या एका नगरांत येऊन दाखल झाला.

ह्या नगरातील एक नामांकित सराफ देवगुप्ताच्या जिवलग मित्रांपैकी एक होता. त्याच्याकडे गेल्यानंतर देवगुप्ताला म्हणावा तसा आदर प्राप्त झाला नाही. कारण देवगुप्त आतां अगदीच गरीब झाला होता त्याची गरिबी जास्तच डोळ्यांत भरावी ह्यासाठी त्याचे जीर्ण कपडे जीवापाड मेहनत घेत होते. मनातल्या मनांत सुवर्णचंद शेठजींच्या आदरातिथ्याकडे हसत देवगुप्त सुवर्णचंद शेठजींना म्हणाला

'सुवर्णचदा, मी आता एका अशा आपत्तीत साप-डलो आहे आठपंधरा दिवसांपूर्वीच माझ्या घरीं चोरी झाली. घरातले नोकर-मुनिमजी इतकेच नव्हे तर नातेवाईकहि माझ्याशी बेइमान झाले. माझी सर्व इस्टेट कर्जापाओ

सावकाराच्या घशात पडली. अशा विपन्नानावस्थेत मला सर्व नाते वाओीक आणि नोकरसुद्धा मला सोडून निघून गेले आहेत. एके काळचा लक्षाधीश असणारा हा देवगुप्त आज तुझ्यापुढे भिक्षाधीश म्हणून उभा आहे. तेव्हा कृपा करून मला काहीतरी उसनवार म्हणून का होओीना पण थोडीफार रक्कम मला धंद्यासाठी दे, धंदा चांगला चालला की मी तुझी रक्कम दामदुपटीने परत करीन, याबद्दल काळजी करू नको. माझ्यावर विश्वास ठेव!

असे म्हणून देवगुप्ताने आपली जीर्ण झालेली पडशी सुवर्णचंद शेठजींकडे करून दीनवाणी चेहऱ्याने त्यांचे पाय धरले.

देवगुप्ताला भिकाऱ्याच्या वेषात बघून सुवर्णचंदाला काळजी पडली की देवगुप्ताला आपण कशाकडे पाहून त्याच्या धंद्यासाठी भांडवल द्यावयाचे ? आणि यदाकदाचित् जर त्याचा धंदा न चालला तर... मग आपल्या भांडवलाची काय वाट...?

हा विचार मनात येताच.. सुवर्णचंद शेठजींच्या अंगावर एकाएकी शहारे आले आणि तो म्हणाला,

'मित्रा ! देवगुप्ता ! रक्कम मी तुला कोणत्या आधारावर द्यावी? दुसरीकडे जाऊन तू आपली गरज भागव. अशा अवस्थेत मी तुला एक मोहरहि देऊ शकत नाही. आणि लक्षात ठेव अशा फुटक्या नशिबाने पुन्हा माझ्याकडे येऊ नकोस,'

असे म्हणून सुवर्णचंदाने देवगुप्ताला नोकरांकरवी बाहेर घालवून दिले.

मध्यान्हसमयी लाडू खाऊन देवगुप्त पुन्हा सायंकाळच्या समयी आपल्या दुसऱ्या एका मित्राकडे जाण्यास निघाला. पहाटेच्या समयास नुकतीच सुरवात झाली होती. अशा वेळी देवगुप्त निर्मल नगराच्या वेशीजवळ येऊन पोहोचला,

या निर्मल नगराचा पंतप्रधान पंडित देवचंद्र हा देवगुप्ताच्या जीवलग मित्रांपैकी एक होता सकाळच्या प्रशांतसमयी एकंदर सर्व हकीगत देवचंद्राच्या कानावर घालून देवगुप्त म्हणाला,

"अशा अवस्थेत तू मला दरबारातील म्हणा किंवा बाहेरील कामावर देखील माझी नेमणूक केली तर मला सुखाने जगता तरी येईल. मी तुझे उपकार जन्मभर विसरणार नाही" असे म्हणून देवगुप्ताने आपल्या अनमोल अशा अश्रूचा पंडित देवचंद्राच्या चरणावर अभिषेक केला.

पाच–सहा बोट लांब वाढलेली दाढी, अंगावर जीर्ण कपडे अशा देवगुप्ताच्या अवताराकडे बघून प्रधानाला आपल्या या कफल्लक मित्राची अतिशय लाज वाटू लागली. अितकेच नव्हे तर देवगुप्ताशीं बोलणेंसुद्धां त्याला कमीपणाचे वाटू लागले, तोंडावर तीव्र नापसंती दर्शवीत प्रधानाची स्वारी देवगुप्ताकडे दुर्लक्ष करून आपल्या खास महालात निघून गेली

या अेका जिवलग मित्राचा अनुभव घेउन देवगुप्त निराश मनाने प्रधानजींच्या महालाची अेकेक पायरी हळूहळू उतरू लागला.

पुन्हा थोडाफार उपाहार करून देवगुप्त आपल्या दुसऱ्या एका मित्राकडे जाण्यास निघाला. गोरज मुहूर्ताच्या वेळी देवगुप्त प्रभातनगरात जाऊन पोहोचला.

प्रभातनगरचा राजा देवगुप्ताच्या जिवलग मित्रांपैकी अेक म्हणून समजला जात होता. ह्या राजाच्या महालात कसाबसा प्रवेश मिळवून देवगुप्ताने आपली एकंदर सर्व हकीगत सांगून आपण मला काहीतरी मदत करावी म्हणून विनंती केली. देवगुप्ताची अेकदम घडलेली हकीगत अैकून राजानें आपणाला फार दु:ख झाले असा आव आणून देवगुप्ताला म्हटलें, मित्रा ! देवगुप्ता पूर्वीचे दिवस आठवले म्हणजे माझे उर अक्षरश: भरून येते. अहाहा ! काय तुझे ते वैभव आम्ही कितीतरी महिने तुझ्या निवासस्थानी विश्रांतीसाठी येत असू. अहाहा ! काय ते आदरतिथ्य आणि आज काय ही परिस्थिति तुझ्या नशिबी आली ? पहिल्यापासूनच तुझ्या डोळ्यावर कसली तरी धुंदी होती येणाऱ्या-जाणाऱ्यांच्या सुखसोयीसाठी तूं पैसा पाण्यासारखा खर्च केला म्हणूनच तुझ्या नशिबी हे दारिद्र आलें आहे. तुझ्या हाताने तू स्वत: वर हा दुर्धर प्रसंग ओढवून घेतला आहे. अशा अवस्थेंत मी तुला मदत करावी अशी आशा तू मनात का बरे धरतोस ? माझ्याकडून तुला मदत करणे तर दूरच अितकेच नव्हे तर अशा अवस्थेत तुला काही देण्याचीसुद्धा मला फार लाज वाटू लागली आहे. तेव्हा तू कृपा करून माझा जास्त वेळ न घेता आल्या मार्गाने परत जा !"

अितके बोलून राजा आपल्या दरबारात निघून गेला. राजाचे हे उद्‌गार ऐकताच देवगुप्ताला अतिशय वाईट वाटले

आणि तो राजवाड्यातून निराशेने बाहेर पडला.

अशा रीतीने देवगुप्ताने या ना त्या तऱ्हेने बहुतेक सर्वच जिवलग मित्रांची परीक्षा पाहिली, त्यामध्ये त्याला फक्त एकच एक तत्त्व आढळून आले. ते म्हणजे सर्वच मित्र लक्ष्मीनारायणाला मान देत होते. दरिद्री नारायणाला पायाजवळसुद्धा उभे करण्याची त्यांना लाज वाटत होती. या बाबतीत देवगुप्त पुरता निराश होऊन गेला होता. निराशेच्या गर्तेत तो सापडला असतानाच त्याच्या मनात एक विचार आला.

आजपर्यन्त आपण लक्ष्मीनारायणाची परीक्षा पाहिली. आता दरिद्री नारायणाची परीक्षा घ्यावयाची असा मनाशी विचार येताच देवगुप्ताला कमालीचा आनंद झाला. त्या आनंदाच्या भरातच त्याने त्रिवेणीपूरच्या दिशेचा मार्ग आक्रमण करण्यास सुरवात केली. ऐन मध्यरात्री देवगुप्त त्रिवेणीपूरला आपल्या दरिद्री मित्राकडे जाऊन पोहचला.

त्रिवेणीपूरला राहणारा देवगुप्ताचा मित्र दासगुप्त हा एक खाऊनपिऊन सुखी असणाऱ्या मित्रांपैकी एक होता. कथा कीर्तन करून मिळेल त्या पैशांवर तो आपली गुजराण करीत होता.

ऐन मध्यरात्री दारावर थाप पडताच दासगूप्त घाईघाईने उठला. दार उघडून बघतो तर दिनांचा कनवाळू उदार अंःतकरणाचा, लक्षाधिश असा जो देवगुप्त आज . . हातात झोळी बोटभर लांब वाढलेली दाढी, अंगावर मलीन झालेले जीर्ण

कपडे, वाढलेल्या जटा असा असलेल्या देवगुप्ताला बघताच दासगुप्ताच्या डोळ्यातून गंगायमुना वाहू लागल्या. क्षणाचाही विचार न करता त्याने देवगुप्ताला अगदी कडकडून मिठी मारली.

मोठ्या आदराने देवगुप्ताला घरात घेतले. पाय धुवायला पाणी देऊन दोन घास भोजन करावे म्हणून विनंति केली. दासगुप्ताच्या प्रेमाच्या विनंतीला मान देऊन देवगुप्ताने प्रेमाने भिजलेल्या मीठ भाकरीचा मोठ्या आनंदाने स्वीकार केला.

निजण्यापूर्वी देवगुप्ताने आपली घडलेली सर्व हकीगत दासगुप्ताला सांगून आपण मला काहीतरी द्रव्याची मदत करावी म्हणून कळकळीने विनंति केली.

देवगुप्ताची ही विनंति ऐकताच दासगुप्ताला अतिशय भडभडून आले, डोळ्यातील अश्रूंच्या प्रवाहांना वाट करून देत दासगुप्त म्हणाला,

' देवगुप्ता तूं म्हणतोस तितकी रक्कम आजतर मजजवळ मुळीच नाही. परंतु अेक दोन दिवसात मी तुला तेवढी रक्कम मिळवून देण्याचा मात्र अवश्य प्रयत्न करीन तुझे माझ्यावर अनंत उपकार आहेत. अशा अवस्थेत आम्ही मित्रांनी तुला मदत न करावयाची तर मग कोणी करावयाची ? वेळ काही सांगून येत नाही. भगवान सूर्यनारायणहि ऐन मध्यान्ह समयीच आपल्या प्रखरपणाने जगाला ताप देत असतात. परंतु त्याच सूर्यनारायणाचे किरण सायंकाळच्या समयी जगाला

शीतलता देण्याचा प्रयत्न करतात. आज तू भिक्षाधीश झाला म्हणून बिघडले कुठे ? एक वेळ अशी येईल की, तू पुन्हा लक्षाधीश होशील.

तू काळजी करू नको. ईश्वराला त्याच्या मुलांची काळजी आहे. अशा प्रकारे देवगुप्ताचे भरल्या अंत:करणाने सांत्वन करून दासगुप्त झोपी गेला. देवगुप्त बराच वेळपर्यंत जागा होता. झोपण्यापूर्वी देवगुप्ताने दासगुप्ताच्या पायाला आदरपूर्वक वंदन केले आणि मग तो शांतपणे झोपी गेला.

एक दोन दिवसातच दासगुप्ताने देवगुप्ताला हव्या तितक्या रकमेची थैली त्याच्या स्वाधीन केली.

रकमेची थैली हातात पडताक्षणीच देवगुप्ताने दासगुप्ताचे पाय धरले आणि त्याला कडकडून मिठी मारली.

'मित्रा दासगुप्ता, तू मोठी विनंति मान्य केलीस. आता फक्त अेक विनंति मी तुला करणार आहे. ती म्हणजे माझ्या नवीन धंद्याच्या उद्‌घाटनप्रसंगी तूं माझ्या दुकानासमोर कीर्तन करावेस. अितकेच नव्हे तरं ह्या समयासच आपण सर्वांनीं माझ्याबरोबर चलावे !'

देवगुप्ताची ही विनंति दासगुप्ताला मोडवेना. मोठ्या प्रेमाने अशा विनंतीला मान देऊन दासगुप्त आल्या बायकापोरासह देवगुप्तासमवेत मंगलपूरनगरचा रस्ता आक्रमण करूं लागला.

थोड्याच दिवसांच्या आत ही सर्व मंडळी सुखरूपपणे

मंगलपूर नगरात येऊन दाखल झाली.

देवगुप्त आलेला समाजताच नगरात जिकडे तिकडे सडासंमार्जन करण्यात येऊन सारे नगर अल्पावकाशात शृंगारले गेले. सुवासिनींनी मोठ्या प्रेमाने देवगुप्तासमवेत असणाऱ्या सर्व पाहुण्यांना ओवाळलें.

एकंदर प्रकाराने दासगुप्त तर अगदीच भांबावून गेला. हे असे अेकदम कसे झाले हेच त्याला कळेनासे झाले.

देवगुप्ताने आपल्या भव्य प्रासादात दासगुप्ताला आणल्यानंतर घडलेली सर्व हकीगत सांगून त्याला म्हटले.

'दासगुप्त! तू खरोखरच अेक श्रेष्ठ मनुष्य आहेस. मित्र कल्याणासाठी तू सावकाराच्या घशात सारे घरदार घातलेस आणि मित्रत्वाचे ऋण योग्य प्रकारे फेडलेस. तुला वाटले असेल मला ही गोष्ट समजली नसेल पण तुझ्या बाबतीत मी पूर्णपणें जागरूक असून तुझी प्रत्येक कृति बघून तुला धन्यवाद देत होतो. माझ्या परीक्षेला तू पूर्णपणें उतरलास. तुझ्या दृष्टीला माती आणि सोने दोन्हीहि सारखीच आहेत हे तू मला पटवून दिलेस. माझ्यावर असणारी भक्ति पाहून कुणीहि हेवा करील. असे म्हणून देवगुप्ताने दासगुप्ताला कडकडून मिठी मारली.

पुढे लवकरच देवगुप्ताने दासगुप्ताला आपल्या पेढीवरचा मुख्य मुनीमजी केले. इतकेच नव्हे तर आपल्या धाकट्या भावाप्रमाणे समजून त्याला अेक भव्य असा प्रासाद खास कारागिरांकडून बांधून दिला आणि त्या बंगल्यावर अेका

पांढऱ्या शुभ्र संगमरवरी पाषाणावर सोनेरी अक्षरात पुढील-प्रमाणे अक्षरे खोदली. ती अशी:–'मित्रभक्तीचे फळ' या नव्या प्रासादात दासगुप्त आपल्या बायका मुलांसह मोठ्या आनंदानें राहूं लागला.

छोट्या दोस्तांनो, ह्याला म्हणावे मित्रभक्ति. संकटकाळीं स्वत:च्या सुखावर निखारा ठेवून जो आपल्या मित्राला मदत करतो त्यालाच खरा मित्र म्हणावे.

□ □ □

# चणे खावे लोखंडाचे

फार वर्षापूर्वीची ही एक गोष्ट आहे. त्या वेळी मंगलपूर नगरात मंगलसेन नावाचा एक अतिशय पराक्रमी असा राजा राज्य करीत होता.

मंगलसेन महाराजांच्या दरबारात "सूरसेन" नांवाचा एक विद्वान् संगीतज्ञ राज-गवयी म्हणून होता.

सूरसेन स्वभावाने अतिशय मनमिळावू, रसिकांचे चाहते आणि उदार अंत:करणाचे होते. मंगलपूर नगरात आणि आसपासच्या खेडयापाडयातून सूरसेनांची कीर्ति कस्तुरीच्या सुगंधाप्रमाणे दरवळत होती. गायनकलेत त्यांची बरोबरी करणारा त्या काळी कोणीच नव्हता. असे असूनहि सुरसेनांनी चुकूनसुद्धा कधी कोणाचा अपमान केला नाही. मोठेपणाचा आव देखील आणला नाही. चार चौघाप्रमाणेच ते स्वत:ला समजत असत. त्यांची कीर्ति ऐकून एके दिवशी प्रभात समयाला एक भुकेला ब्राह्मण सूरसेनांच्या वाड्यात आला. प्रभातसमयाची वेळ. सूरसेन गायनात तल्लीन झालेले होते. परंतु आपल्या दाराशी एक याचक आलेला बघताच सूरसेनांनी आपले गायन बंद केले खांद्यावरील तंबोरा बाजूला ठेवून ते त्या ब्राह्मणाजवळ आले आणि म्हणाले,

"कोण आपण ! कोठून आलात ? आत चला." असे म्हणून त्यांनी त्यांचा हात धरला. आपल्या दिवाणखान्यातील

पांढऱ्याशुभ्र गादीवर त्यांना बसविले आणि पेलाभर दूध बाहेर आणण्यास आपल्या वायकोला सांगितले

दूधप्राशन झाल्यानंतर सुरसेनांनी त्या ब्राह्मणाला विचारले.

"आता आपण आपली हकिकत मला सांगा. शक्य झाले तर मी आपणाला मदत करण्याचा प्रयत्न करीन."

सूरसेनांनी इतकें आश्वासन दिल्यानंतर तो याचक शांतपणे म्हणाला,

"सूरसेन महाराज ! आपली कीर्ति ऐकून मी आपल्या चरणाजवळ धाव घेतली आहे. आपले अन्त:करण उदार आहे. तेव्हां आपण मला अंतर देणार नाहीं. अशी खात्री आहे. मी एक गरीब ब्राह्मण आहे. वायकापोरांचे पोट भरण्यासाठी एकसारखें वणवण भटकावे लागत आहे. काम मागतो पण कोणी काम देत नाही. असें सारखें चालले आहे तेव्हा आपण तरी मला काहीं काम द्याल म्हणून मोठया आशेने आलो आहे.

हे ब्राह्मणाचे उद्गार ऐकताच सूरसेन महाराजांना त्या ब्राह्मणाची अतिशय दया आली. मोठ्या आनंदाने त्यांनी त्याला आपल्याकडे कामाला ठेवून घेतले.

सूरसेन महाराज मंगलपूरच्या राजांच्या खास मर्जीतले असल्यामुळें सूरसेन महाराजांना नगरातच नव्हे तर आसपासच्या गावागावातूनहि गायनाचे कार्यक्रम करण्याची परवानगी असे. त्यामुळें दसरा, दिवाळी, पाडवा, रामनवमी, नवरात्र, कोजागिरी इ. मंगलप्रसंगी सूरसेन महाराजांच्या शास्त्रोक्त गायनाचे

कार्यक्रम जास्तीतजास्त बिदागी देवून ठेवण्याची जणू गांव-कऱ्यात अगदी स्पर्धा लागे. आसपासच्या गावातील अशा रसिकांच्यामुळे कोणकोणत्या गावी केव्हा कार्यक्रम आहे याची योग्यवेळी नोंद करणे, बिदागी घेणे, वाद्यांची निगा राखणे इत्यादि कामावर लक्ष ठेवण्यास सूरसेन महाराजांना बिलकूल जमत नसे. तेव्हा याच कामावर त्यानी त्या ब्राह्मणाची नेमणूक केली होती.

सूरसेनांकडे राहणारा तो ब्राह्मणहि हळूहळू सर्वांगीण बाबतीत सुधारु लागण्याची चिन्हे दिसू लागली होती.

याप्रमाणे पुष्कळ वर्षे गेली सूरसेन महाराजांच्या कृपेवर वाढलेल्या ब्राह्मणाच्या मनात सूरसेन महाराजांविषयी असूया निर्माण झाली. त्यांची वाढती संपत्ति आणि लोकप्रियता त्या ब्राह्मणाला सहन झाला नाही त्याच्या मनात अनेक प्रकारचे कुविचार येऊ लागले. तो मनाशी म्हणे

''आज एक तप झाले आहे. आपण सारखे सूरसेन महाराजाच्या संगतीत आहोत. तेव्हा आपणालाहि संगीतकला अवगत झाल्यासारखीच आहे. आता मला संगीताची पुष्कळ माहिती झाली आहे. माझ्यात आणि सूरसेन महाराजांत आता फारसा फरक राहिला नाही. संगीतातील ताल, स्वर रागातील खाचा खोचांचे ज्ञान मलाहि प्राप्त झालेले आहे. बस झाली ही गुलामी! तेव्हा आपणहि गायनाचे कार्यक्रम व लोकप्रियता इतकेच नव्हे तर संपत्ति मिळवावी आणि शक्य झाल्यास "राजगवयी" हा किताबहि मिळवावा. येत्या रामनवमीला रामाच्या जन्मोत्सवा-

निमित्य सुरसेन महाराजांचें गाणें आहे त्यावेळी मंगलमहाराजहि उपस्थित राहणार आहेत. तेव्हा आपणहि त्यावेळी गायन करुन आपण सूरसेनापेक्षाहि श्रेष्ठ आहोत असे त्यांना पटवून देऊ. मग काय राजगवयी किताब आणि त्याबरोबरच संपत्ति आणि लोकप्रियता यांची माळ आपल्या गळयांत आपोआपच पडेल ! इत्यादि आनंदाचे मनोरथ रचीत असतानाच तो ब्राह्मण झोपीं गेला.

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे सूरसेन महाराजांकडे कामधाम झाल्यानंतर तो ब्राह्मण अगदी शांतपणे म्हणाला,

" महाराज ! येत्या रामजन्मोत्सवाच्या वेळी मला गायन करण्याची अतिशय इच्छा आहे. आपण संधि दिली तर मंगल-महाराजांना माझी खरी किंमत कळल्याशिवाय राहणार नाही"

ब्राह्मणाचे हे विचार ऐकताच सूरसेन महाराजांना विलक्षणच आश्चर्य वाटले. कधीकाळी ब्राह्मणाच्या तोंडून असे उद्‌गार निघतील अशी त्याना स्वप्नातसुद्धा शंका आली नव्हती. त्यांना अतिशय वाईट वाटले; परंतु आपले दु:ख चेहऱ्यावर प्रदर्शित न करता सूरसेन शांतपणे म्हणाले,

"जशी तुमची इच्छा." इतके बोलून सूरसेन महाराज संगीत कलेच्या आराधनेसाठी आपल्या खास महालात निघून गेले.

महाराजाचे उद्‌गार ऐकताच म्हणाला, आपण आत्ताच राजगवयी झालो असा भास होऊ लागला. आता रामनवमी येते कधी आणि मी गायन करतो कधी असे त्या ब्राह्मणाला होऊन गेले.

रामनवमीचा दिवस उजाडला. ब्राह्मण अतिशय आनंदात होता. बायकापोरांनाहि अत्यानंद झाला होता. रामनवमी आणि आनंद, पक्वान्नांची जोडहि उत्तमच असावी म्हणून ब्राह्मणाच्या बायकोने खास पुरणपोळीचा बेत केला. पुरणाची पोळी तुपात जास्त चांगली लागते, असा ब्राह्मणाचा खास अनुभव होता. ब्राह्मणाचा बेत आवडता, मग काय विचारता ? ब्राह्मणाने झक्कासपैकी ८–१० पुरणपोळ्या ७-८ ओगराळे भरून असलेल्या तुपात भिजवून खाल्या. गायनाचा कार्यक्रम आहे. घसा ताजावा लागतो. भरपूर खाल्लेले बरे असा मनाशी विचार करूनच ब्राह्मण पुरणपोळीचा यथेच्छ समाचार घेत होता. आणि इकडे. . . .

सूरसेन महाराजांची आपल्या बायकासमवेत रात्री होणाऱ्या शास्त्रोक्त गायनाची तालीम चालली होती. त्यावेळी त्यांना जेवण्याचीसुद्धा शुद्ध नव्हती, फक्त पेलाभर दूध पिऊन त्यांनी भुकेला पिटाळून लावले होते. इतके ते गायनात तल्लीन झाले होते. मधूनच ते आपल्या वादकांना स्वर समजावून सांगत. मधूनच नवीन ताल सांगत, नाहीतर कोणता स्वर केव्हा मोठा घ्यावा, समेवर कोणता आलाप असतांना यावे. अशा एक ना हजारो सूचना देत असताना ते केवळ माहिती व्हावी, याच हेतुने देत. त्यामध्ये मी फार शहाणा आणि तुम्ही अगदीच "हे" असा हेतु बिलकूल नव्हता. वादकांनाहि त्यांच्याबद्दल अतोनात प्रेम होते. म्हणूनच त्याचे ज्ञान श्रवण करण्यात त्याना एक प्रकारची धन्यता वाटत असे.

रामाच्या जन्मोत्सवाच्या दिवशी आपल्याला जनता जनार्दनाची सेवा अधिकाधिक चांगल्या प्रकारे करता यावी, यासाठी

सूरसेन महाराज आपल्या आवाजाची जास्तीतजास्त काळजी घेत होते. रोजचा आहार नियमित होता. त्यांत तेलकट, आंबट तुरट पदार्थांना मज्जाव होता. जनताजनार्दनाची सेवा करीत असतांना आपला आवाज मध्येंच फूटूं नये, चिरकू अथवा बसूं नये यासाठीं सूरसेन महाराज फारच दक्षता घेत असत. नेहमीप्रमाणें त्यांनीं ह्याहि वेळेला अतिशय दक्षता घेतलेली होती. आपल्या वादकांसमवेत ते रात्री म्हणावयाच्या चिजांची तालीम करीत होते. मध्येंच थांबत होते. सूर बदलीत होते. तबला, पेटी, तंबोरा सारंगी, पखवाज इत्यादि अनेक वाद्यांचा स्वरमेळ ते मोठया कौशल्यानें उपयोगांत आणून मोठया तन्मयतेनें गात होते.

सायंकाळच्या समयाला त्यांनीं आपला तंबोरा खाली ठेवला त्यावेळी एक प्रकारचें आत्मिक समाधान त्यांच्या मुखावर खेळत असल्याचें दिसून येत होतें.

रात्रीच्या ठरलेल्या वेळेपूर्वी अर्धा घटका लवकर येण्यास सांगून त्यांनीं हंसतमुखानें आपल्या वादक स्नेह्यांचा निरोप घेतला. आणि ते तेथून निघून गेले.

इकडे तो ब्राह्मण आरामात झोपेतून जागा झाला. निवडक रागांची मनातल्या मनात उजळणी करुन एकप्रकारची स्वतःची समजूत करून घेतली. आपलें आतां सर्व झालें आहे. अशा आनंदाच्या भरांत त्यांनीं गायनासाठीं खास सुशोभित केलेल्या मंडपात पाऊल ठेवलें.

रामाच्या जन्मोत्सवाचा दिवस जिकडेतिकडे आनंदीआनंद चालला होता. आणि त्या आनंदांच्या दुधांत साखर म्हणजे

विद्वान् संगीताचार्य सूरसेन महाराजांचे गायन मग काय ? मंडप स्त्री-पुरुष आबालवृद्धांनीं अक्षरशः फुलून गेला होता.

मंडपांत एका बाजूला एक भव्य सुशोभित असे व्यासपीठ तयार केलेलें होतें, अनेक झुंबरें त्या ठिकाणीं लावण्यात आली होती. व्यासपीठावरील वादक मोठ्या तन्मयतेने वाद्यांची जुळवाजुळव करण्यांत गुंग झालेले दिसत होते.

मंगल महाराज आल्याची वर्दी होतांच सर्व प्रेक्षकगण शांतपणे उभा राहिला. आणि मोठया आनंदानें त्यांनीं जयजयकार केला. महाराज स्थानापन्न झाल्यानंतर ईश-स्तवन आणि पद्य झाल्यानंतर सूरसेन महाराजांनीं गायनास आरंभ केला.

मध्यरात्रीचा पहिला प्रहर झाला. दुसरा प्रहर सुरु झाला. तेव्हां त्यांनीं त्या वेळीं म्हणावयाचे राग आळवून म्हणण्यास सुरवात केली. अल्पाअवधीतच आपल्या सहजसुंदर अशा आवाजाने त्यांनी प्रेक्षकाची मनें आकर्षित करुन टाकली. इतकेंच नव्हे तर त्यांना देहभानहि विसरावयास लावलें.

सूनेसेनमहाराजांचें गायन चालू असता मंगलमहाराज मधूनच अहाहा ! वा ! काय छान ! ओ होऽहो, असे उद्‌गार काढून आपणाजवळ असलेलीं रत्नें ते मोठ्या आनंदाने सूरसेन-महाराजांच्या अंगावर उधळीत. बराच वेळ त्यांचे असें चालले होते. सूरसेन महाराजहि कलेंत प्राण ओतून गात होते अखेर मध्यरात्र झाली त्यांनी शांतपणें अर्धा घटका विश्रांति घेण्यासाठी तंबोरा खालीं ठेवला. आणि ते व्यासपीठावरून बाजूला झाले.

मधल्या काळांत जनताजनार्दनाच्या सेवेत खंड पडू नये

म्हणून त्यांनी त्या ब्राह्मणाला त्याच्याच इच्छेवरून गायन करण्यास विनंति केली.

तो ब्राह्मण मोठ्या आढ्यतेनें उठला. मुद्दामच त्यानें तंबोऱ्याच्या तारा छेडून वघितल्या. तबला वाजवून पाहिला. सर्व कांहीं ठीक आहे, असा मनाशीं विचार करून त्यानें स्वर आळविण्यास सुरुवात केली.

सर्व प्रेक्षकगणांना वाटलें, हा खरोखरच उत्तम प्रकारचा गायक असला पाहिजे. सूरसेनमहाराजांच्या संगतींत राहून यानें खरोखरच संगीतकला आत्मसात केली असेल. लोक मोठ्या आनंदानें त्या ब्राम्हणाच्या गायनकलेकडे बघूं लागले,

अर्धा पात्र घटका झाल्यानंतर आपली शाल अंगाभोंवतीं लपेटून त्यानें आपल्या मंगलमहाराजांना सप्रेम अभिवादन केलें आणि सूरसेनमहाराजाकडे जळजळीत दृष्टीनें पाहून गायनास प्रारंभ केला.

दुपारचे जेवण भरपूर झालेले असल्यामुळें त्या ब्राह्मणाच्या कंठातून तान कशी ती निघेनाच. आवाजहि कांहीं म्हणावा तसा नव्हता. स्वर आणि ताल धडपणें गातांच येईना. कोणते राग केव्हां गावे याचेंहि ज्ञान त्यानें न ठेवता म्हणावयास सुरुवात केली. आधींच स्वरज्ञान नाहीं आणि ह्याला जोड म्हणजे भरपूर जेवण. मग काय विचारता ? त्याचा आवाज निघे तो मधूनच चिरके, त्याला तान कांहीं घेता येईना. त्यामुळें घेतलेली तान अर्ध्यावरच संपे असे एक ना अनेक ! कितीतरी घोटाळे त्याच्या गाण्यांत होऊं लागले. ब्राह्मणाची ही

अवस्था बघून लोकांना कांहीं राहवेना. सर्वजण मोठमोठ्याने हंसूं लागले. टाळ्या पिटूं लागले. कोणी तर नाचूं लागले

हा एकंदर प्रकार बघून तो ब्राह्मण खरोखरच अतिशय खजील झाला. अशावेळीं जगणेंदेखील त्याला नकोसे झालें. आपण खरोखर भलत्याच आशेच्या नादीं लागून स्वत:चें हंसें करून घेतलें. योग्यता नसतांना देखील मोठेपणा प्राप्त करण्याचा प्रयत्न केला. याची बोंचणी त्या ब्राह्मणाच्या हृदयाला होऊं लागली. इतका प्रकार झाला तरी त्याला आपलें गाणें मध्येंच सोडावेसे वाटेना. गाणें पुरें करावें आणि मगच उठावे असा मनाशीं विचार करून तो गाणें गातच राहिला.

मंगलमहाराजांनाहि विनोद सुचला.ते म्हणूं लागले

"खरोखर काय आवाज आहे ?

वाहवा ! वा ! ! "

हें ऐकतांच ब्राह्मणाला आपणाला ह्या वेळेला धरणी पोटांत घेईल तर बरें होईल असें वाटलें. गाणें अर्ध्यावरच सोडून तो खालीं मान घालून व्यासपीठावरून खालीं उतरला आणि आपल्या पूर्वनियोजित जागेवर येऊन बसला.

सर्व प्रेक्षकगणांत झालेली ही अवस्था त्याला अजिबात सहन होईना पण करतो काय ? "योग्यतेशिवाय मोठेपणा" मिळविण्याचा हा खटाटोप अंगलट आला होता.

एवढा प्रकार होईपर्यंत पहांट होत आली होती. एक दूधाचा पेला पिऊन सूरसेन महाराजांनीं मंगल महाराजांना सप्रेम अभिवादन केलें आणि तंबोरा हातांत घेतला.

सूरसेनमहाराज गायनाला बसले, हें बघतांच लोकांना अतिशय आनंद झाला. चोहोंकडून टाळ्याचा एकसारखा कडकडाट झाला. जनताजनार्दनाला पुन्हां एकदां सप्रेम अभिवादन करून त्यांनीं भूप राग गावयास सुरूवात केली. त्यावेळीं प्रेक्षगणांत कमालीचें नवचैतन्य पसरलेलें दिसत होतें. सगळीकडे विलक्षण शांतता पसरली होती. गायनाच्या अद्‌भूतपूर्ण कौशल्यानें त्यांनीं अल्पावधींतच सर्व प्रेक्षकगणांना मंत्रमुग्ध करून सोडलें. प्रेक्षक सर्व कांहीं विसरून गेलें. आपल्या नेहमींच्याच परिचयांतील परंतु उत्तमोत्तम राग गाऊन त्यांनीं पुन्हां एकवार आपल्या सहज सुंदर आवाजाने सर्व प्रेक्षकगण मंत्रमुग्ध करून सोडला. मंगलमहाराजहि अतिशय खूश झालें, सूरसेनमहाराजांनी त्या दिवशीं आपली सर्व गायनकला जनताजनार्दनाच्या चरणीं मुक्त हस्तानें उधळलेली होती.

अखेर प्रभात झाली. तेव्हां भैरवी गाऊन सूरसेनमहाराजांनीं तंबोरा खालीं ठेवला. आणि जनताजनार्दनाला सप्रेम वंदन केलें. त्यावेळीं चोहोंकडून टाळ्यांचा कडकडाट झाला. त्याबरोबरच पुष्पांचा आणि मोहरांचा त्यांच्यावर वर्षाव झाला. त्यांच्यागळ्याभोंवतीं पुष्पाहारांनीं तर अक्षरश: भाऊगर्दी करून सोडली होती.

अशा प्रसंगी मंगलमहाराजांना तर अजिबातच राहवेना. ते आपल्या आसनावरून उठले आणि आपल्या गळ्यांतील तेज:पुंज असा 'कोहिनूर हिऱ्याचा हार त्यांनीं सूरसेनमहाराजांच्या गळ्यांत घातला, इतकेंच नव्हे तर "नगर संगीत कोहिनूर"

ही पदवी आणि पांच गांवांची जहागिरी दिल्याची घोषणा त्यांनीं केली. त्यावेळीं पुन्हां एकदां टाळयांचा कडकडाट झाला.

हा सर्व प्रकार पाहिल्यानंतर ब्राह्मणाला सूरसेन महाराजांचा गायनावर किती अधिकार आहे, याची संपूर्ण कल्पना आली. त्यांची बरोबरी करणें म्हणजे खरोखरच एक महान् दिव्य आहे, असा विचार त्यांच्या मनांत आला. "साधनेशिवाय कला हस्तगत होत नाहीं. कष्टाशिवाय फळ मिळत नाहीं." साधनाशिवाय आणि योग्यतेशिवाय मोठेपणा आपण मिळविण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच आपली आज फजिती झाली. हि गोष्ट आपण वाईट केली. असा मनाशीं विचार करून त्यानें सूरसेनमहाराजांच्या पायावर डोकें ठेवलें आणि पश्चात्तापाच्या अश्रूंनीं त्यानें सूरसेनमहाराजांच्या चरणावर अभिषेक केला.

□ □ □

# देव भक्तीचा भुकेला !

फार फार वर्षापूर्वीची ही गोष्ट आहे. एक आटपाट नगर होते. त्या नगरात एक जवाहिऱ्याचा व्यापारी रहात होता.

तो व्यापारी त्या नगराचा नगरशेठ म्हणून ओळखला जात होता. आपला सर्व व्यवहार तो प्रामाणिकपणाने करित होता. नगरात शेतीही पुष्कळ होती गांवात सावकारी ही त्याने चालू ठेवली होती पण प्रत्येक व्यवहार धुतल्या तांदळासारखा होता. त्यात लबाडी नव्हती अगर फसवाफसवीही नव्हती.

दानधर्मातहि नगरशेठ मागे पडत नसे. नगरात जे जे म्हणून धार्मिक कार्य निघे, त्या प्रत्येकात त्याचा वाटा हा सर्वाहून जास्तच असे

कोणीहि त्यांच्याकडे जावे आणि म्हणावे, शेठजी ! मुलांची मुंज काढलेली आहे. जवळ पैसा नाही'

शेठजीनं लगेच दिवाणजीला सांगावे 'दिवाणजी द्या त्यांना पंचवीस मोहरा' कोणी गरिबानं यावे शेठचे पाय धरीत म्हणावे,

'शेठ घरात दाणा नाही. पोरेबाळे उपाशी रहायची पाळी आली' शेटजीनी लगेच एकदोन पोती धान्य त्याच्याकडे रवाना करावे

शेठजी सर्वांच्या उपयोगी पडायचे. कोणीही याचक त्यांच्या पेढीवरुन रिक्त हाताने परत जायचा नाही. आटपाट नगरात सगळीकडे त्यांच्या नावाचा बोलबाला होत होता.

नगरात साधुसंत जोगी बैरागी यायचे. त्याचे हसतमुखाने स्वागत व्हायचे, भूकेल्यांना पोटभर अन्न व तहानलेल्यांना थंडगार पाणी. ऋणाहताला ऋण.

अशा सर्व गोष्टी नगरशेठ आनंदाने करायचे त्यात गर्व नव्हता अभिमान नव्हता, होती ती फक्त परोपकारी वृत्ती. त्या वृत्तीला अहंकाराचा चूकूनही वास येत नव्हता.

लोकांना माझ्याकडून घेण्याइतके मिळते आणि परमेश्वर ते माझ्याकडून द्यायला लावतो 'अशी प्रामाणिक समजूत होती.

असे बरीच वर्ष चालले. वर्षानुवर्षे त्याची आमदानी वाढतच होती.

परंतु एके दिवशी सकाळी एक घटना घडली. सर्वांना आश्चर्यच वाटले.

नगरशेठनीं सर्व वैभव सोडून भक्तीमार्गाचा अवलंब करण्याचे ठरविले.

नुसतच ठरविले नाही तर आचरणांतही आणले.

त्यांनी आपले सर्व वैभव सोडून एका दूर ठिकाणी एक झोपडी बांधली आणि त्या झोपडीत ते आपल्या बायकोसह राहू लागले.

पती हाच परमेश्वर असे मानणारी ती एक साध्वी व पतिव्रता स्त्री होती. आपल्याला अशी बायको मिळाली यात नगरशेठ परमेश्वराचीच कृपा समजत.

आपल्या नवऱ्याबरोबर तीही पण सावली आपले सर्व वैभव सोडून पतिसमवेत पर्णकुटीत राहू लागली.

परंतु या संताच्या पुण्यभूमीला निंदेचा पण एक शाप आहे. त्यातून कोणाचीच सुटका झाली नाही मग नगरशेठ वल्लभदास यांची कशी सुटका होणार ?

त्यांच्या अनेक हितशत्रूंनी निंदेचे वादळ उठविले.

'अहो ! हा कसला आला आहे भक्त ? हे तर सगळ ढोंग आहे. व्यापारात हज्जारो लोकांना दीनदुबळ्यांना लुबाडून हा चांगला गब्बर झालेला आहे. ह्या पापाच्या पैशावर पांघरूण घालण्यासाठी म्हणूनच त्याने ईश्वरभक्तीचे हे एक नवीनच सोंग जनतेपुढें सादर केले आहे. त्यात काय अर्थ आहे ? हा तर सगळा अनर्थ आहे.

आपल्या सभोवताली निंदेचे हे प्रज्वलीत वलय दिवसेंदिवस वाढत असतांना देखील वल्लभदासांनी आपली ईश्वरभक्ती सोडली नाही.

'इतकेच नव्हे तर सर्व प्राणिमात्रांनी संसार साधून परमार्थ साधावा. त्यातच मानवाची उन्नति आहे. उन्नतिप्रत मानवाला नेणारा एकच मार्ग आहे, तो मार्ग म्हणजे भक्तीमार्ग, ह्या भक्ती

मार्गानेच ईश्वराला प्रसन्न करून मानवाने स्वतःच्या कल्याणा-बरोबरच इतरांचेही कल्याण करावे'

हा एक उपदेश ते आपल्या कथा–किर्तनातून श्रोत्यांना देत असत.

सर्वांना वल्लभदासांचे किर्तन खूप खूप आवडे. परंतु त्यांच्या निंदकाना मात्र ते आवडत नसे त्यांची तळपायाची आग मस्तकाला जाई.

त्यांनी वल्लभदासाचे किर्तन मोडण्याचे ठरविले.

आषाढी एकादशीचा दिवस होता गोरजमुहूर्ताची वेळ निंदकांनी शेसव्वाशे ताकदवान अशा गायी किर्तन मंदिराकडे पिटाळल्या. आता किर्तनाच्या रंगाचा बेरंग होणार या समाधानात सर्व निंदक होते.

येणाऱ्या संकटाची चाहूल वल्लभदासांना लगेच समजली. त्यांनी पांडुरंगाचा धावा केला.

आणि काय चमत्कार—

आलेल्या गायी किर्तनमंडपाच्या ठिकाणीच स्तब्ध झाल्या आणि त्यांना प्रेमरसाचा दुग्ध पान्हा फुटला.

हा सर्व चमत्कार पाहून निंदक आश्चर्यचकित झाले. निंदकापैकी निम्मे निंदक वल्लभदासांचे शिष्य झाले

पण जे निम्मे निंदक उरले होते. त्यांची खुमखुमी अजून मात्र तशीच राहिली होती.

त्यांनी आटपाट नगराच्या राजाकडे धाव घेतली. आणि राजाविक्रमसिंगाला वल्लभदासाची आख्यायिका सांगितली.

आणि असेही सांगितले की,

' वल्लभदासाचे भक्तिमार्गाचे वर्चस्व वाढत चालले तर आम्हा वैदिक ब्राह्मणांना कोणी विचारणार नाही व ब्राम्हणा-बरोबरच राजाची किम्मत पण घसरुन जाईल तेव्हा महाराजांनीं वेळीच धोका लक्षात घेऊन या वल्लभदासाचा बंदोबस्त करावा.

हा एकंदर प्रकार ऐकल्यानंतर चक्रमसिंगही हादरुन गेला.

त्याने लगेच वल्लभदासाला बोलावणे धाडले.

राजाज्ञेला मान देऊन वल्लभदास गळ्यात माळा टाकून हातात चिपळ्या घेऊन 'जय हरि विठ्ठल श्रीहरी विठ्ठल' असा घोष करित करितच दरबारात हजर झाले.

गौरवर्णाची बुटगेलेशी गळयात रुद्राक्षाच्या माळा कपाळी गंधाचा टिळा. अशी वल्लभदासाची मूर्ती पाहताच. राजा विक्रम-सिंहाचे हात आपोआपच जोडले गेले.

परंतु धर्म मार्तंडांनी लगेच त्याच्या कर्तव्याची जाणीव दिली.

राजा सिंहासनावर स्वत:ला सावरीत वल्लभदासांना म्हणाला.

'हे भक्त श्रेष्ठा ! मी तुला एक कामगिरीं सांगतो ती जर तू पार पाडली तर मी तुला खरोखरच भक्तश्रेष्ठ मानीन'

माझा मुलगा कुष्टरोगाने घरात पडून आहे त्याचा संपूर्ण कुष्टरोग जर तू आपल्या परमेश्वराच्या साह्याने बरा केलास तर मी तुझ्या वाटेला जाणार नाही. नाहीतर तुला ह्या आटपाट नगरातून हद्दपार करुन तुझे हे भक्तीमार्गाचे सोंग आहे असे भरदरबारात जाहीर करीन.

'हे राजाधिराजा ! ठिक आहे तुझ्या मुलाला रोगमुक्त करण्याचे आश्वासन देतो मला फक्त तीन दिवसाचा अवधी दे.

प्रत्यक्ष पांडुरंगच ह्या दरबारात येऊन तुझ्या मुलाला रोगमुक्त करील, माझा देवावर विश्वास आहे आणि भक्तीवर अढळ श्रद्धा आहे.

रोगाने अवयव लुळे पडलेला अस्थिपंजर झालेला राजाच्या मुलास आपल्या मांडीवर घेऊन भरदरबारातच वल्लभदासाने पांडुरंगाचा धावा करण्यास सुरुवात केली.

निंदकाच्या छातीत धडकी भरली राजाही पण पुत्रासाठी भरदरबारात सिंहासनावर बसून राहिला. ना तोंडात अन्न ना पोटात पाणी.

तीन दिवस झाले व तीन रात्री पर्यन्त वल्लभदासांचा विठ्ठल नामाचा गजर चालूच होता. त्यांच्या पोटात अन्नाचा कण नव्हता की तोंडात पाण्याचा थेंब नव्हता. निराहारपणे वल्लभदासाने केलेला धावा ऐकून ऐन मध्यरात्रीच्या सुमारास प्रत्यक्ष पांडुरंग भरदरबारात हजर झाले.

त्यांनी राजपुत्राच्या देहावरुन हात फिरवताच राजपुत्राचा देह दिव्य झाला.

राजपुत्राचा देह दिव्य झालेला पाहुन आटपाट नगरातील सर्व नगरवासी धावत झाले. राजा विक्रमसिंगही आश्चर्य-चकीत झाला.

साक्षात पांडुरंग आलेले पाहून वल्लभदासांनी गहिवरुन आले परमेश्वराच्या पायांना मिठी मारुन वल्लभदास म्हणाले,

'देवा पांडुरंगा भक्ताने दिलेल्या शब्दासाठी तू प्रत्यक्ष धावत आलास

आपल्या भक्ताच्या पाठीवर हात ठेवून पांडुरंग म्हणाले.

'अरे परमेश्वर फक्त भक्तीचा भूकेला असतो जशी जो माझी सेवा करतो त्या प्रमाणात मी मेवा देत असतो'

तुझी भक्ती पाहुन मला आनंद झाला होता म्हणून मी तूझ्या प्रत्यक्ष भेटीस आलो.'

'तूझा जो गौरव तोच माझा गौरव असे म्हणून पांडुरंग अंतर्धान पावले.

तेव्हा सगळीकडे विठ्ठल नामाचा गजर झाला राजाने वल्लभदासाच्या पायावर डोके ठेऊन म्हटले भक्त श्रेष्ठा ह्या अभाग्याला क्षमा करा.'

'राजा तूला पांडुरंगाचा साक्षात्कार झाला आता न्यायाने वागून गोरगरिबांना आश्रय देऊन तू राज्य कारभार कर. असे म्हणून वल्लभदासाने राजाला आयुष्मान भव असा आशिर्वाद देऊन दरबारातून प्रयाण केले.

□□□

एके दिवशीं नित्याप्रमाणें पंतांचा वडील मुलगा जना आंघोळीसाठीं बसला असतां समोरच्या झुडुपांतून एक भला मोठा नाग फुत्कार टाकीत फणा उभारून जोरानें सळसळत बाहेर आला. एखाद्या पिंजऱ्यात ठेवलेला कैदी सोडून देतांच आपले उग्र रूप धारण करतो त्याचप्रमाणें त्यानें आपले रूप धारण केले होतें. त्याचे ते चमकदार डोळे व काळीभोर जीभ, अगदीच भयानक दिसत होती. "नाग, नाग!" म्हणून जनानें मोठयानें आपल्या आईला हांक मारली व तो पळण्याचा प्रयत्न करुं लागला. परन्तु तेवढयांत नागानें त्याच्या पायाजवळ उडी घेऊन त्याच्या सर्वांगाला एक जोराचा विळखा घातला व त्याच्या पायाला कडकडून चावा घेऊन त्यानें विद्युत्‌गतीनें पलायन केले. निमिषांत तो त्या दाट झुडपांत विलीन झाला.

आई धांवतच बाहेर आली व तिनें प्रेमभरानें आपल्यां पुत्राला आपल्या बाहुपाशांत कवटाळलें. सर्वत्र हाहाःकार उडाला. प्रत्येकजण धाय मोकलून रडूं लागला. पण त्याचा उपयोग काय? जनाचा आत्मा केव्हांच पंचमहाभूतांमध्यें विलीन झाला होता. सगळया आसपासच्या बायका पुरुष धांवत आले. त्यापैकीं एकजण घाईघाईनें पन्तांना बोलविण्यास देवळांत गेला पण त्यास जे सभोंवार दृश्य दिसले त्यामुळें तो तर अगदी चकीतच झाला.

पंतांचें कीर्तन ऐन रंगात चाललें होतें. लोकहि त्यांना मोठया आनंदानें साथ करीत होते. प्रत्येकजण भजन म्हणण्यांत अगदी तादात्म्य पावला होता. पंतहि देहभान हरपून विठ्ठले-

लाच्या चरणीं भावात्म्य पावले होते. आपला मुलगा देहत्याग करुन गेला याची पुसटशी कल्पना पन्तांना आली म्हणूनच की काय, पन्त इतरांबरोबर देवाची आळवणी करीत होते.

पन्त थोडयाच वेळात भजन कीर्तन आटोपून बसतात न बसतात तोंच. . . त्यांना समजले कीं, आपला जना नाग चावून मृत्युमुखी पडला. ते ऐकल्याबरोबर पन्त आणि प्रचंड भक्तगण यांच्या शोकाला पारावारच उरला नाही. घाईनें ते पन्तांच्या मुलाकडे पन्तांसमवेत आले. येऊन पाहतात तो जनाचा देह अगदीं काळाकुट्ट पडून गेला होता. पन्तांनीं अनेक औषधोपचार केले. वनस्पतिचे अर्क सर्वांगावर चोळले. आतां बाळ उठेल या वेड्या समजुतीनें त्यांनीं स्वत: अनेक उपाय केले. इतरांनीहि आपापल्या परीनें आपलें कसब पणाला लावलें. पण तें सर्व कांही व्यर्थ!

पन्तांनीं क्षणभरच वेड्या मनाला मोकळे सोडले होते ते पुन्हां त्यांनीं आपल्या ताब्यात आणले व आपल्या पांडुरगांची भक्ति खंड न पडता चालूंच ठेवली. अतिशय उत्साहानें व आनंदानें. हें पाहून तर पंढरीच्या पांडुरगाला अतिशय आश्चर्य वाटलें व त्याबरोबरच त्यांच्या मनांत भक्ताविषयीं प्रेमाचे वृक्षाला असणारीं फुलें गळून त्याजागीं फळें धरूं लागला.

इतकें झाल्यानंतर देखील पंढरीचे पांडुरंग स्वस्थ न बसतां केवळ रखुमाईच्या सांगण्यावरुन आपल्या आवडत्या अशा भक्ताची परीक्षा घ्यावी असे त्याच्या मनात आलें. परन्तु आपल्या रखुमाईला म्हणाले, "आपण परिक्षा घेत आहोंत

खरी, परन्तु माझा भक्त कदापीहि भक्तीपासून पदच्युत होणार नाहीं याचा अनुभव मला मागेंच आला आहे.

देवा मागची गोष्ट वेगळी होती. ह्या वेळची निराळी आहे. पण मी तुम्हाला ग्वाही देते कीं, निदान ह्या पाळीला तरी तुमचा आवडता भक्त आपल्या स्वकर्मापासून जरी ढळला नाही तरी माझ्या मागणीपुढे मात्र त्याला ह्या पाळीला कर्तव्याला तरी चुकावे लागणार यांत मात्र शंका नाहीं."

"पण देवी! लक्षांत ठेव विजय माझाच होईल!"

"देवा आतां निष्कारण बोलण्यांत काय अर्थ आहे ! आपण आपल्या कार्यास प्रारंभ करूच."

ठरल्याप्रमाणें भक्ताची परीक्षा पाहण्याची संधी रखूमाअीला आलीच. अखेर पैंजेचा दिवस उजाडला. रखूमाअी मात्र आज खूपच गडबडीत होती.

पन्त नित्याप्रमाणें भजन पूजन आटोपून गरिबांना दानधर्म करित होते. बऱ्याच वेळेनंतर दानधर्म आटोपून पन्त घरांत आले व हातपाय धुवून जेवायास बसणार अितक्यांत. . .

एक म्हातारी घाबऱ्या घाबऱ्यानें पन्ताच्या दारांत आली आणि पन्ताना हांका मारूं लागली. हांक ऐकतां क्षणीच पन्त भरल्या ताटावरून उठलें आणि बाहेर आले. समोरच एका पडवीत एक म्हातारी उर फाटेपर्यंत रडत होती. रडून रडून तिचे लालबूंद डोळे सूजून गेले होते. व पायहि सुजले होते. उन्हाच्या दाहकतेमुळें तिचे सर्वांग घामाने ओलेचिंब झाले होते. अंगावरील लक्तरामुळें, भुकेमुळे खोल गेलेले पोट स्पष्टपणे

दिसत होते. अशा अवस्थेंत पाहताक्षणींच पन्तानी तिला घाई घाईनें उठविलें, घरांत आपलें, न्हाऊ माखू घातले. साडी चोळी नेसावयास दिली. व जेवण्यासाठी बसावयास पाट दिला. पन्ताचें हे सारे पाहिल्यानंतर ती म्हातारी मनांतून चांगलीच संतोष पावली 'देवापुढे मला नक्कीच हार खावी लागणार असें दिसतें'.

'पन्ता माझ्या सारख्या गरिबाची आपण अितकी टेप ठेवतां हे पाहून मला अतिशय आनंद वाटला परंतु

'काय आपली अिच्छा आहे ?'

'तुमच्या जवळ माझें' एकच मागणें आहे तें जर पुरें केले तर माझ्या नवऱ्याचे प्राण तर वांचतील आणि माझ्या कपाळीचें कुंकू तेजानें उजळत राहील. माझ्या नवऱ्याचे प्राण केवळ आपल्याच हातांत आहेत'.

काय आपले मागणें आहे ते चटकन् सांगा. माझा प्राण जरी त्या कामी खर्ची पडत असेल तर ते मी माझें भाग्य समजेन'

हे घ्या वचन ? असें पन्तांनी म्हटल्यानंतर त्या म्हातारीनें एक आवंढा गिळला आणि ती म्हणाली, 'बाबारे, तूं खरोखरच धन्य आहेस. माझ्या पतीच्या रक्षणासाठीं तूं प्राणाचीहि पर्वा केली नाहींस. देव खरोखरच तूला उदंड आयुष्य देऊन तूझें कल्याण करील'

'एक! फारच दिवसांपासून माझा नवरा महारोगानें आजारी असून त्यांची दृष्टीहि गेली आहे एकंदांहि त्याला बरें वाटलें नाहीं. कधी खात नाही कां पित नाहीं. हजारो उपाय केले तीर्थयात्रा केल्या परंतु गुण असा कधी आलाच नाही. काल

जेंव्हा एका खेड्यात तुझें नांव ऐकलें तेंव्हा मनाशी विचार केला कीं तुला तरी दाखवून पहावें म्हणून रात्रभर चालून चालून मोठ्या पहांटे ह्या गांवांत आले. तुझ्या आजवर केलेल्या पुण्याचें पुण्योदक जर तूं माझ्या नवऱ्याचें मुखात घातलें तर माझा नवरा दुःखांतून उठेल आणि त्याची दृष्टि त्याला पुन्हा प्राप्त होईल आणि जन्मांतरीचे माझें कुंकू तुझ्या कर्तृत्वानें सदैव उजळ राहील.

माझा नवरा गावा बाहेरच्या एका धर्मशाळेंत आहे. त्याला येथें घेवून येते. नंतर तूं आपलें पुण्योदक त्याच्या मुखांत घाल.

त्या म्हातारीचें हे करुण शब्द ऐकून पन्ताच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या आणि ते करुण स्वरांत म्हणालें, 'बाओ! तूं ही गोष्ट प्रथमच मला सांगितली असती तर किती बरें चांगलें झाले असते. मला उभ्या आयुष्यांत कितीतरी पुण्य मिळवितां आले असते परंतु तुला प्राणाहूनहि प्रिय असलेला तुझा नवरा मात्र तुला ह्या जन्मात कांहीं मिळवितां येणार नाही. तुमची एव्हढी मागणी मी केंव्हाच पुरी केली असती आतां बोलण्यांत वेळ घालवूं नका चला आपण त्यांना घेऊन येंऊं'. असें म्हणतच पन्त अनवाणीच त्या बाईच्या पाठोपाठ जाऊं लागले. बऱ्याच वेळानें ते गावाबाहेरच्या धर्मशाळेंत येऊन पोहोचले. धर्मशाळेंत तो म्हातारा एक जीर्ण लंगोटी लावून खोकत बसला होतात्याच्या सर्वांगांतून पू गळत होता. सर्व अवयव बधिर होऊन गेले होते. समोरची फुटकी भांडी आणि फाटके कांबळे देखील स्वाभिमानशुन्य मुद्रेनें अिकडे तिकडे 'आ' वासून त्या भयानक परिस्थितीचे अस्तित्व दाखवीत होते. ते

एकंदर दृष्य पाहून पन्तीच्या हृदयाचे शतशः तुकडे झाले. त्यांनी क्षणाचाहि विचार न करता त्या महारोगी म्हाताऱ्याला आपल्या खांद्यावर घेतले आणि ते घरी येण्यास निघाले.

चैत्र महिना भर दुपारची वेळ. ऊन कडक पडले होते-आणि अशावेळी अंगावर पंचाशिवाय दुसरें वस्त्र नाही. पायात कांही नाही त्यामुळे सारख्या घामाच्या धारा वाहत होत्या. पायाला चटके बसत होते परंतु कशाचीहि पर्वा न करतां पन्त आपल्या घराचा रस्ता आक्रमण करीत होते. थोड्याच वेळांत पन्तानी त्या म्हाताऱ्याला घरी आणून बाजेवर निजविलें. बायकोला पाणी गरम करण्यास सांगून त्यांनी गरम केलेंल्या पाण्यानें त्या म्हाताऱ्याचा सर्व देह पुसून काढला व त्याला एक पैरण व धोतर नेसविलें आणि एका हातांत पाणी घेऊन ते मंतरुन त्या म्हाताऱ्याच्या तोंडात घालतां क्षणीच . . . त्या म्हाताऱ्याच्या ठिकाणी हातांत चक्र, पद्म, शंख, गदाधारी अशी तेजः पुंज महा-विष्णूची मूर्ति हंसऱ्या चेहऱ्याने पन्ताकडे पहात असलेली दिसली व त्याच्याच उजव्या हाताला पन्ताचा मुलगा जना हा पण दिसत होता व ती म्हातारी महालक्ष्मीच्या वेषामध्यें 'श्री विष्णूच्याच शेजारी उभी होती,

आपण स्वप्नांत तर नाही अशी शंका पन्तांना आली. होते काय आणि झाले काय? झालेल्या घटनेवर त्याचा विश्वासच बसेना, परंतु पन्तांना खुद्द परमेश्वरांनीच जेव्हा हांक मारली तेव्हा मात्र पन्त धाओनें परमेश्वराजवळ गेले आणि आदराने पाय धरुन आपल्या आनंदाश्रुंचे त्यावर सिंचन केले· परमेश्वराने आपल्या परम अशा भक्ताला आनंदाने आपल्या हृदयाशी

कवटाळून प्रेमालिंगन दिले. महालक्ष्मीनें रमाला हाक मारून तिचा जना आदरपूर्वक तिच्या स्वाधीन केला.

श्री विष्णू म्हणालें, 'पन्त केवढ तुमचं भाग्य थोर ! रमासारखी महासाध्वी प्रतिव्रता अशी स्त्री तुम्हाला सहचारिणी म्हणून लाभली. जना, नामा अशी आनंद निर्माण करणारी मुलें तुमच्याच घरात जन्माला आली, खरोखरच तुम्ही धन्य आहांत तुमच्या भक्तीवर व उदारपणावर आम्ही दोघं अतिशय संतुष्ट झालो. कसल्याहि प्रकारचा संकोच मनांत न बाळगतां आपणाला जे हवे असेल ते अत्यानंदानें मागून ध्या'.

देवा मजला कशाचीहि अिच्छा नाहीं. केवळ माझ्या पुण्याअीमुळेच आपण मला दर्शन दिलें.

आपणाशिवाय मला सुखाची अिच्छा नाही तुमच्या पश्चात मला स्वर्गाची अिच्छा नाही. तुमच्या विरहित मला वैभवाचीहि अिच्छा नाहीं. माझ्या ह्या भक्तीभावानें बहरलेल्या उद्यानांत आपला साक्षात्कार मला रोज व्हावा हीच माझी अिच्छा'

'ठिक आहे' असें म्हणून पन्तांना त्या दोघांनी प्रेमळ आशिर्वाद दिला आणि म्हणाले, तुझ्या ह्या आटपाट नगरांत सर्व सजीव प्राणी देखील सुखासमाधानाने राहतील. सदैव साम्राज्य नांदेल तुझे हे आटपाट नगर पृथ्वीच्या पाठीवर एक पवित्र असे क्षेत्राचे ठिकाण होअील तुझी ही दोन मुलें देखील तुझ्या प्रमाणेंच परमभक्त अशी होतील आणि ते सदैव माता पित्यांच्या नावांनी विख्यात होतील.

अशा प्रकारें त्यांना वर देऊन श्री लक्ष्मी व विष्णु या दोघांनी 'तथास्तु' असें म्हटलें आणि आपल्या भक्ताकडे व मातापुत्राकडे प्रेमळ व कृपाळू दृष्टींने पाहून व शुभाशिर्वाद देऊन ते अन्तर्धान पावलें.

□ □ □

# सुवर्णाची समई

एक छोटंसं खेडेगाव होतं. त्या खेडेगावात एक भिकारी राहात होता. त्याला दोन मुले होती.

भीक मागून आलेल्या शिळ्यापाक्या तुकड्यावर त्या कुटुंबाचा उदरनिर्वाह कसाबसा चालत असे.

भिकारी स्वभावाने दयाळू होता. मिळेल त्या भिक्षेवर भिकारी खूष होता. मिळालेली भिक्षा अगदी अपुरी असे. कधी पोटभर त्यांना भिक्षा मिळत नसे.

आज भिक्षा मिळाली तर उद्या मिळत नसे. त्यामुळे साहजिकच त्या भिकाऱ्यावर आणि त्याच्या कुटुंबावर कधी कधी उपासमारीचाही प्रसंगी येई.

असे बरेच दिवस झाले. एके दिवशी दिवाळीचा मंगलमय दिवस उजाडला.

त्या दिवशी .... भिकाऱ्याला दुर्दैवाने कोठेच भिक्षा मिळाली नाही.

त्याच्या डोळ्यात अश्रू जमा झाले, तेव्हा तो देवी लक्ष्मीला हात जोडीत म्हणाला.

"आई देवी लक्ष्मी ! काय ही माझी स्थिती. माझ्या पोटच्या गोळ्यांना आज घासभर अन्नही खायला मिळाले नाही.

मी गरीव अनाथ म्हणून तू माझ्याकडे येत नाहीस का ?

आता ही लाचारी, ही गरिबी पुरे झाली. तुझ्या कृपेचा वरदहस्त पडू दे एकदा ह्या लेकरांवर."

असं म्हणून त्याने मनोभावे देवी लक्ष्मीची प्रार्थना केली आणि तो झोपी गेला.

पहाटेची वेळ झाली तेव्हा एक दिव्य तेजोवलय त्या भिकाऱ्यासमोर आले आणि त्या वलयातून एक आवाज आला.

"हे बघ ! आज तुला कोणतीही आणि कसल्याही प्रकारची भिक्षा मिळाली तर नीटपणे जतन करून आण.

तुझ्या भाग्योदयाला आता सुरुवात झाली आहे, हे लक्षात ठेव.

असं म्हणून ते तेजोवलय हळूहळू लहान होत गेलं.

दुसऱ्या दिवशी प्रभातसमयी भिकारी उठला. देवी लक्ष्मीची मनोमन प्रार्थना करून त्याने आपली जीर्ण झालेली झोळी खांद्यावर लावली आणि नेहमीप्रमाणे तो भिक्षा मागत मागत गावातून हिंडू लागला.

हिंडता हिंडता तो एका सावकाराच्या दारासमोर आला आणि लाचारीच्या आवाजात म्हणू लागला.

"माई भिक्षा वाढ ! माई भिक्षा वाढ !"

सावकारपत्नी घरातील अडगळ बाहेर काढण्यात गर्क होती.

भिकारी नजरेला पडताच ती सावकारपत्नी त्याला म्हणाली,

"ए भिकारड्या ! बाहेर बघत काय उभा राहिलास. हे सामान बाहेर फेकून द्यायला मदत कर ! म्हणजे तुला भिक्षा वाढीन."

"बाई ! तुम्ही काही काळजी करू नका. तुम्हांला मी मी आनंदानं मदत करीन."

सावकारपत्नीने बाहेर फेकून देण्याचे सामान बाहेर काढले त्यात काही फुटक्या बाटल्या, जुन्या चिंध्या, फुटक्या तपेल्या इत्यादि सामान होते. हे सर्व सामान पाहिल्यानंतर भिकारी मनाशी विचार करू लागला.

हे सर्व फेकून देण्यापेक्षा आपणच हे सामान घेऊन घरी जावे. तेवढाच आपल्याला उपयोग होईल.

असा मनाशी विचार करून तो भिकारी घाबरत घाबरतच परंतु धीर धरून म्हणाला,



"बाई ! एकविचारू काय ?"

"काय विचारतोस ? विचार की !"

"बाई ! तुमची हरकत नसेल तर ही अडगळ मी घरी घेऊन जाऊ का ? माझ्या संसाराला तेवढीच मदत होईल."

"अगदी खुशशाल घेऊन जा ? अडगळ उकिरड्यावर पडली काय अन तू नेलीस काय ? मला दोन्हीही सारखंच आहे."

असं म्हणून सावकारपत्नीने घरातून एक फाटके पोते आणून ती सर्व त्या भिकाऱ्याला देऊन टाकलं.

भिकाऱ्याने ते पोतं मोठ्या आनंदाने उचलून खांद्यावर घेतले. सावकारपत्नीला नमस्कार करून तो मोठ्या आनंदाने घरी आला.

पोते घरी आणून दिल्यानंतर तो पुन्हा भिक्षा मागण्यासाठी गावात फिरू लागला.

भिकारी गेल्यानंतर भिकाऱ्याच्या बायकोने ते पोते सोडले. आतील वस्तू पाहताच त्या बिचारीचा आनंद गगनात मावेनासा झाला.

दुसऱ्या दिवशी सकाळीच भिकाऱ्याची बायको उठली आणि पोत्यातील एक एक वस्तू काढून बाजूला ठेवू लागली.

पोत्यातील फुटक्या तपेल्या व भांडी काढून ती घासू लागली.

घासता घासता त्या फुटक्या भांड्यात एक काळी ठिक्कर पडलेली लहानशी समई निघाली.

घरात विठोबाच्या पुढे तेलवात घालायला ही समई चांगली आहे. असं पाहून ती समई भिकाऱ्याची बायको घासू लागली.

समई जसजशी घासली जाऊ लागली त्या त्या प्रमाणात तिचा काळेपणा जाऊन तिचे मूळचे तेज अधिकच शोभायमान दिसू लागले.

आणि सरतेशेवटी ती समई सुवर्णाची आहे हे तिला समजले, तेव्हा तिने ती समई झटदिशी आपल्या फाटक्या

पदराखाली झाकली आणि घरात आणून रांजणात लपवून ठेवली.

सायंकाळच्या वेळी खांद्याला रिकामी झोळी अडकवून निराश मनाने एक एक पाऊल अडखळत अडखळत टाकीत आपला नवरा घरी परत येत असलेला पाहताच तिला अतिशय आनंद झाला.

त्या आनंदाच्या भरातच तिने तो घरी आल्यानंतर कोप-ऱ्यातील रांजणात ठेवलेली समई त्याला दाखवली.

भिकाऱ्याला अतिशय आनंद झाला. भिकाऱ्याने देवी लक्ष्मीला मनोभावे हात जोडले.

त्या दिवशी रात्रीच, सगळीकडे सामसूम झाल्यानंतर भिकाऱ्याने त्या समईत तेलवात घातली. देवाचे नाव घेऊन ती पेटवली. हळूहळू तिच्यातून दिव्य प्रकाश पडू लागला आणि समईभोवती एक प्रकाशाचे मोठे वलय दिसू लागले. त्या वलया-तून एक देवता बाहेर आली आणि भिकाऱ्याला म्हणाली, "तुझ्यावर मी प्रसन्न झाले आहे. तू कोणताही वर माझ्याजवळून मागून घे."

भिकारी आणि त्याची बायको फार बावरले, पण धैर्य एकवटून तो भिकारी म्हणाला, "हे देवते, तू धन्य आहेत. माझा आज कीतीक वर्ष दारिद्रयाने पाठलाग केला आहे. माझे आयुष्य त्यामुळे पिचून गेले आहे या दारिद्रयातून माझी सुटका कर. आणि परमेश्वराची कृपा सतत माझ्यावर असू दे एवढेच माझे मागणे आहे."

"तथास्तू" म्हणून ती देवता अदृश्य झाली. तो दिव्य प्रकाश, ते वलय, नाहीसे झाले. भिकारी आणि त्याची पत्नी सुखासमाधानाने झोपी गेली.

पहाटे ते उठून बघतात तो सगळाच चमत्कार झाला होता. त्यांची झोपडी जाऊन त्या ठिकाणी मोठा महाल उभा होता. एका सुंदर मंचकावर ते दोघे झोपले होते, आणि त्यांच्या सेवेसाठी नोकरांची धावपळ चालली होती. एका सुंदर देवघरात ती सुवर्णाची समई शांतपणे तेवत होती.

□ □ □

# पाषाणातला माणूस

रामपूर हे एक छोटेसे खेडेगाव होते. निसर्गाच्या बाहुपाशात लाडाने विसावलेले आणि वाढलेले.

रामपुरची वस्ती असेल पन्नास पाऊणशे उंबरठ्यांची.

रामपुरात सरकारी दवाखाना होता. नगरपालिका होती, प्राथमिक शाळाही होत्या.

एक आदर्श आणि नमुनेदार खेडे म्हणून ह्या रामपुरचा लौकिक जिल्ह्यात पसरला होता.

गावात कितीतरी सधन शेतकरी होते. बागाइतदारही होते.

कुणाचे द्राक्षाचे मळे होते.

कुणाच्या केळीच्या बागा होत्या.

कुणाचे पानमळे होते, तर कुणा शेतकऱ्याची शेती विहिरीच्या पाण्याखाली भाजीपाला पिकवीत होती.

लोक भाविक मनोवृत्तीचे होते. गणपती उत्सव, होळी, अनंत चतुर्दशी, रामजन्मोत्सव असे समारंभ गावकरी एकजुटीने पार पाडायचे.

गावात विलक्षण प्रकारची एकजूट होती. गावातील तंटेबखेडे चार चौघांच्या संमतीने सुटायचे, सारे गाव गुण्यागोविंदाने नांदत होते.

ह्याच रामपुरात दौलतराव नावाचा एक सधन शेतकरी राहत होता. मोठे प्रगतिशील शेतकरी म्हणून त्यांचा रामपुरात बोलबालाही होता. रामपुरात दौलतरावांच्या शद्बाला मानही खूप मोठा होता.

दौलतराव अतिशय सच्छील स्वभावाचे आणि दयाळू अंत:करणाचे होते. त्यांची शेतीही खूप मोठी होती. त्यात बागाईत होती आणि जिराईत जमीनही खूपच मोठी होती.

पानमळे, फळा-फुलांच्या बागा, मनोहर अशी आमराईही नमुनेदार मोहरली होती. मजुरांच्या रूपाने जणू परमेश्वराचे हातच त्या शेतांत राबत होते की काय कुणास ठाऊक ? पण शेती दौलतरावावर मेहरबान होती. धान्याच्या रूपानं मोत्यांच्या राशी दौलतरावांच्या घरावर वधूवरांवर अक्षता उधळाव्यात तशी उधळत होती.

दौलतरावही स्वभावाने देवभोळे होते. अगत्य तर त्यांच्या पाचवीलाज पुजलेले होते की काय कुणास ठाऊक ? पण वाडा नेहमी पाहुण्यांनी गच्च भरलेला असायचा, नोकरांची एकसारखी धावपळ चालूच असायची.

अडीअडचणींना गरिबांच्या मदतीला धावून जाणारा प्रतिपरमेश्वर म्हणजे दौलतराव.

रामपुरातील कल्पतरू म्हणूनही रामपुरातील लोक आदराने त्यांचे नाव घेत. एक विलक्षण असा भक्तिभाव दौलतरावांविषयी रामपुरच्या जनमानसात वसलेला दिसत होता आणि त्याचा प्रत्ययही ठायी ठायी येत होता.

एक दिवस काय झाले, अमावस्येची काळीकुट्ट रात्र होती. सारे रामपूर निद्रेच्या अधीन झाले होते.

याला दौलतरावांचा वाडाही अपवाद नव्हता; दिवस-भराच्या श्रमाने शेतावर आणि मळ्यात राबणारे दौलतरावांचे नोकर-चाकरही शांतपणे झोपी गेले होते. वाड्यात कोणीसुद्धा जागे नव्हते.

जागे होते ते फक्त चोरांचे दहा डोळे. आपले सर्वांग काळ्या घोंगडीने लपेटून घेऊन हातात असणाऱ्या विजेरीच्या प्रकाशाच्या साहाय्याने ते पुढे पुढे सरकून वाड्याचा मार्ग आक्रमण करीत होते.

थोड्या वेळाने त्यांनी वाड्यात प्रवेश केला आणि पहाट होण्यापूर्वीच धान्यांनी भरलेले एक एक पोते खांद्यावर टाकून आले तसे निघून गेले. पुन्हा सगळीकडे शांतता पसरली आणि त्या शांततेत रातकिड्यांच्या आवाजाचीही भर पडली.

काळोखाची शाल दूर करून सूर्याची कोवळी उन्हे अंगा-वर घेत घेतच रामपुरातील दिवस उगवला.

नेहमीप्रमाणे दौलतराव उठले. पाहतात तर धान्याच्या पोत्यांची थप्पी ढसळलेली.

त्यांनी भराभर आपल्या नोकरचाकरांना आवाज दिला. मुलांना जागे केले.

दौलतरावांच्या घरात धान्याची चोरी झाली. हां हां म्हणता चोरीची बातमी वाऱ्यासारखी रामपुरात घराघरांतून पसरली आणि प्रत्येकजण हातातला कामधंदा सोडून, दौलत-रावांच्या वाड्यात दाखल झाला.

चोरांचा टोळीप्रमुख मात्र घाईघाईने दौलतरावांच्या पाया पडत म्हणाला,

"पाटील, चुकलो मी, क्षमा करा मला. घरात धान्य नव्हतं म्हणून पोरं उपाशीपोटी होती. काम मागावं तर मिळत नव्हतं. म्हणून या वगाळ कामाचा मार्ग धरावा लागला. तुम्ही ही जबानी दिली नसती तर माझी आणि माझ्या साथीदारांची बायकापोरं उपाशी तडफडत राहिली असती. सारी उघड्यावर पडली असती. फार उपकार झाले बघा तुमचे आम्हा गरिबावर देहाच्या पायघड्या घालाव्यात अशी तुमची योग्यता. पण आम्ही भलतंच करून बसलो. पाटील चूक झाली, पदरात घ्या!"

असं म्हणून चोरांचा नायक दौलतरावांचे पाय धरून स्फुंदून-स्फुंदून रडू लागला.

त्याला आपल्या हृदयाशी प्रेमभरानं कवटाळीत दौलतराव म्हणाले.

"अरे, चांगली धट्टीकट्टी माणसं तुम्ही, चोऱ्या करणं चांगलं नाही. चोऱ्या करून लाजिरवाणं जीवन जगण्यापेक्षा श्रमाची ओली सुकी मीठ-भाकरी कितीतरी चांगली ! त्यात स्वाभिमान आहे, प्रामाणिक कष्ट आहेत. हे विसरू नका." दौलतराव आपला स्नेहपूर्ण हात फिरवीत म्हणाले.

"नाही नाही. आता आम्ही चोरी करणार नाही. नाही काम मिळालं तर लाकडं फोडू, जंगलात मध गोळा करू अन्य काहीतरी करू पण हे हात पुन्हा चोरी करून विटाळू देणार नाही."

असं म्हणून चोरांच्या नायकाने आपल्या साथीदारांसह दौलतरावांच्या पाया पडून शपथ घेतली.

तेव्हा दौलतराव म्हणाले,

“जा आता, घरी बायकापोरं वाट बघत असतील. त्यांना भेटा. माणुसकीला ज्यामुळं कलंक लागेल अशी कोणतीही गोष्ट अथवा कृत्य करू नका. जाताना वाड्यावरून धान्य घ्या. पण चोरी करू नका.

“नाही नाही एक वेळ आम्ही उपाशी मरू, पण शपथ मोडणार नाही.” असं म्हणून चोरांचा नायक आपल्या साथीदारांसह दौलतरावांच्या पाया पडला आणि तिथून निघाला.

त्यांच्या पाठमोऱ्या आकृतींकडे पाहातच दौलतराव मनाशी म्हणाले, ‘आज मी धन्य झालो आणि या अज्ञ वाट चुकलेल्या लोकांच्या हृदयांत माणुसकी फुलवली. आता ते माणूस म्हणून जगतील, माणूस म्हणून व्यवहार करतील.”

मनाशी विचार करीतच ते तिथून निघाले त्या वेळी त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रूंनी गर्दी केली होती.

□ □ □

...वाचनालय शाखा.
.........
.........
१४४८
३।१०।८१
दि.

## लोकप्रिय मंगल प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| १) | मंगल कथा भाग १ | दुसरी आवृत्ती छापत आहोत |
| २) | मंगल कथा भाग २ | " |
| ३) | मंगल कथा भाग ३ | " |
| ४) | मंगल कथा भाग ४ | " |
| ५) | सुंदरगोष्टी | २.०० |
| ६) | गोष्ट सांगतो ऐका भाग १ | १.२५ |
| ७) | गोष्ट सांगतो ऐका भाग २ | १.२५ |
| ८) | मयूरा | ५.०० |
| ९) | हेरांच्या चातुर्य कथा | ४.०० |
| १०) | अणुगुपितांचे रहस्य | ४.०० |
| ११) | तिरुपतीच्या कथा | १.०० |
| १२) | फार फार वर्षा पूर्वी | १.०० |
| १३) | दक्षिणेतील देव कथा | ४.०० |
| १४) | धन्य ती मातृभक्ति | १.०० |
| १५) | गोष्टींचा खजिना | ३.५० |
| १६) | भारतीय साहित्याचा इतिहास | १५.०० |

आकर्षक सजावट : स्वस्त नि सुंदर

मंगल प्रकाशने आजच मागवा.

**मंगल प्रकाशन**

८५, माधवनगर, नागपूर १०